# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. २१ नोव्हेंबर २०२४

किंमत ४ ₹


## मतदानाच्या दिवशीच भानामतीचा प्रकार

**महाड :** रायगड जिल्ह्यातील बिरवाडीमध्ये मतदानाच्याच दिवशी भानामतीचा प्रकार केल्याचे समोर आले आहे. महाडजवळील बिरवाडी शहराच्या नाक्यावर एका रस्त्यावर मधोमध तीन मडकी आणि नारळ रचून ठेवण्यात आल्याचे दिसून आले. लाल आणि काळ्या फडक्याने मडक्याचे तोंड बंद करून खाली नारळ अशा स्वरूपात हा भानामतीचा प्रकार केल्याचे समोर आला आहे. बिरवाडी आसनपोई रस्त्यावरील नाक्यावर आगदी मधोमध हा उतारा ठेवण्यात आला आहे. यामुळे ग्रामस्थांमध्ये काही प्रमाणात भीती आणि संतापाचे वातावरण पसरले आहे.

## शिस्तभंगाची कारवाई अवैध

**नवी दिल्ली :** कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर किंवा सेवेच्या वाढीव कालावधीनंतर निवृत्त झाल्यानंतर त्याच्याविरोधात कोणतीही शिस्तभंगाची कारवाई सुरु करणे अवैध आहे, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. झारखंडमधील नवीन कुमार या बँक कर्मचाऱ्याविरोधात सुरु करण्यात आलेली शिस्तभंगाची कारवाई अवैध असल्याचा निर्णय झारखंड उच्च न्यायालयाने दिला होता. त्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडियाने या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने एसबीआयची याचिका फेटाळून लावली.


घरातील प्रत्येकासाठी!
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कॉम्प्युटर कोर्स
Powered by Artificial Intelligence (AI)
Learn Basic to Advanced
New Age Digital Skills
mscit.mkcl.org
प्रवेशासाठी आजच MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.


## वेधक

### मतदान यंत्रात बिघाड

**माणगाव :** महाड विधानसभा मतदारसंघातील माणगावमधील निजामपूर भागातील बोंडशेत येथील मतदान केंद्रावर मतदान सुरु झाल्यानंतर सकाळच्या सत्रात ७ ते ९ वाजेपर्यंत ९.८२ टक्के मतदान सुरळीत झाले. त्यानंतर सकाळी ९.०५ मिनिटांनी मतदान यंत्रात अचानक बिघाड होऊन बीझी लॅम्प दिसत नसल्यामुळे मतदान थांबले. त्यानंतर या मतदान केंद्राचे बूथ प्रमुख सुधीर पाटील यांनी तातडीने संबंधित निवडणूक अधिकारी यांना कळविले. त्यानंतर तातडीने यंत्र दुरुस्ती पथक बोंडशेत येथील मतदान केंद्रावर पोहोचले. त्यानंतर मतदान सकाळी ९.४५ मिनिटांनी पूर्ववत सुरु झाले.

### झारखंडमध्ये मतदान संपले

**नवी दिल्ली :** झारखंड विधानसभा निवडणुकीच्या शेवटच्या आणि दुसऱ्या टप्प्यात १२ जिल्ह्यांतील ३८ जागांवर बुधवारी सायंकाळी ५ वाजता मतदान संपले. झारखंडमध्ये संध्याकाळी ४ वाजेपर्यंत ६७.५९ टक्के मतदान झाले. या निवडणुकीत झारखंड मुक्ती मोर्चाचे (जेएमएम) उमेदवार आणि मुख्यमंत्री हेमंत सोरेन, त्यांच्या पत्नी कल्पना सोरेन आणि विरोधी पक्षनेते आणि भाजपचे उमेदवार अमरकुमार बौरी यांच्यासह ५२८ उमेदवारांचे भवितव्य ठरणार आहे.

### आठ राज्यांमध्ये दाट धुके

**नवी दिल्ली:** राजधानी दिल्लीसह उत्तर भारतातील राज्यांमध्ये थंडी सतत वाढत आहे. घसरत्या तापमानाबरोबरच दाट धुके पसरत आहेत. उत्तर भारतातील अनेक जिल्ह्यांमध्ये बुधवारी हवामान खात्याने दाट धुक्याचा इशारा जारी केला आहे. धुक्याचा सर्वाधिक परिणाम उत्तर प्रदेशात दिसून आला. कानपूरमध्ये शून्य दृश्यमानता आणि लखनऊमध्ये ५० मीटरपर्यंत कमी झाली आहे. बिहारच्या पूर्णिया, पंजाबच्या भटिंडा, हरियाणाच्या सिरसा आणि मध्यप्रदेशच्या ग्वाल्हेरमध्ये ५०० मीटरपर्यंत दृश्यमानता नोंदवण्यात आली आहे.



# रायगडाने गाठली साठी

## पाच वाजेपर्यंत ६१.०१ मतदान | नव, महिला, ज्येष्ठ मतदारांची अलोट गर्दी

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघातील केंद्रामध्ये मतदारांचा उत्साह दिसून आला. जिल्ह्यात पाच वाजेपर्यंत ६१.०१ टक्के मतदान झाले. १८ ते १९ वर्षांवरील, ८५ वर्षांवरील तसेच दिव्यांग मतदारांनी घराबाहेर पडून मतदानाचा हक्क बजावला. त्यामध्ये महिलादेखील मागे नसल्याचे दिसून आले. काही मोजक्याच मतदान केंद्रात इव्हीएम व व्हीव्हीपॅट मशीन बंद पडल्या होत्या. त्यामुळे मतदान उशिरा सुरु झाले होते. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा कडेकोट पहारा ठेवण्यात आला.

अलिबाग-मुरुड-रोहा विधानसभा मतदारसंघात मतदानाला सकाळी सात वाजल्यापासून सुरुवात झाली. काही मतदारसंघात अल्प, तर काही ठिकाणी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सकाळी सात ते नऊ या दोन तासांच्या कालावधीत ७.५५ टक्के मतदान झाले. अलिबाग मतदारसंघात ८.७ टक्के, पेणमध्ये ९ टक्के, महाडमध्ये ६.३५ टक्के, पनवेलमध्ये ७.३५ टक्के, उरणमध्ये ८.१ टक्के, श्रीवर्धनमध्ये ७.०३ टक्के, आणि कर्जतमध्ये ६.५ टक्के मतदान झाले. या मतदारसंघामध्ये पेण, त्याखालोखाल अलिबाग, उरण, पनवेल मतदारसंघात सर्वात जास्त मतदान झाले. त्यानंतर मतदानाचा टक्का हळूहळू वाढू लागला. तरुण मतदारांसह महिला, ज्येष्ठ व दिव्यांग मतदार स्वयंस्फूर्तीने मतदान करण्यासाठी घरातून बाहेर पडले. दरम्यान, सकाळी अकरा वाजेपर्यंत २०.४० टक्के मतदान झाले. अलिबाग विधानसभा मतदारसंघात १९.४५ टक्के मतदान, पान ५ वर

### मतदारसंघनिहाय टक्केवारी

| | | |
|---|---|---|
| अलिबाग ६७.६ | पनवेल ५२.०९ | कर्जत ६५.०८ |
| उरण ६६.८४ | पेण ६१.०८ | श्रीवर्धन ५७.७२ |
| महाड ६४.०४ | | |

### नेतेमंडळींनी बजावला हक्क

शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील, जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकापचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हात्रे, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, महाविकास आघाडी पुरस्कृत शेकाप उमेदवार चित्रलेखा पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, ॲड. गौतम पाटील, संदीप शिवलकर, अश्विनी पाटील, अनिल चोपडा, संजना कीर, तसेच उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षातील जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, पिंट्या ठाकूर, काँग्रेसचे समीर ठाकूर, शेकाप तालुका चिटणीस अनिल पाटील, नागावच्या सरपंच हर्षदा हर्षदा मयेकर, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील थळे, नागावचे माजी सरपंच नंदकुमार मयेकर, निखील मयेकर वेगवेगळ्या भागातील महाविकास आघाडी व शेकापचे सर्व पदाधिकारी, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत तसेच विविध संस्था संघटनांचे आजी–माजी पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते, महिला, तरुणांनी मतदान करून मतदानाचा हक्क बजावला.






## राज्यात पाच वाजेपर्यंत ५८.२५ टक्के मतदान

**मुंबई :** विधानसभा निवडणुकसाठी गेल्या महिन्याभरापासून राजकीय पक्षांनी कंबर कसली होती. राजकीय पक्षांनी सभा आणि प्रचाराचा धडाका लावला होता. संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे मतदान बुधवारी पार पडले. यावेळी उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएम मशीनमध्ये बंद झाले आहे. महाराष्ट्रातील २८८ विधानसभा मतदारसंघासाठी निवडणूक झाली. शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन पक्षफुटीनंतर ते पहिल्यांदाच विधानसभा निवडणुकीसाठी सामोरे गेले. या निवडणुकीची पाच वाजेपर्यंतची मतदानाची टक्केवारी समोर आली आहे. राज्यात सायंकाळी ५ वाजेपर्यंत ५८.२२ टक्के मतदान झाले आहे. राज्यातील जिल्हानिहाय मतदानाची टक्केवारी पुढीलप्रमाणे : अहमदनगर - ६१.९५ टक्के, अकोला- ५६.१६, अमरावती-५८.४८, भंडारा- ६५.८८, बुलढाणा-६२.८४, चंद्रपूर- ६४.४८, धुळे- ५९.७५ , औरंगाबाद- ६०.८३, बीड- ६०.६२, गडचिरोली-६९.६३, गोंदिया-६५.०९, हिंगोली- ६१.१८, जळगाव- ५४.६९, जालना- ६४.१७, नंदुरबार- ६३.७२, नाशिक -५९.८५, उस्मानाबाद- ५८.५९ टक्के, पालघर- ५९.३१, यवतमाळ- ६१.२२, कोल्हापूर- ६७.९७, लातूर ६१.४३, मुंबई शहर-४९.०७, मुंबई उपनगर-५१.७६, नागपूर- ५६.०६, नांदेड - ५५.८८, परभणी- ६२.७३, पुणे- ५४.०९, रायगड- ६१.०१, सातारा- ६४.१६, रत्नागिरी- ६०.३५, सांगली- ६३.२८, वाशिम -५७.४२, सिंधुदुर्ग- ६२.०६, सोलापूर -५७.०९, ठाणे- ४९.७६, वर्धा - ६३.५० टक्के मतदानाची नोंद करण्यात आली आहे.

## ‘राज्यात मविआचे सरकार येणार’

**मुंबई :** महाराष्ट्रातील एकूण २८८ जागांसाठी बुधवारी मतदान प्रक्रिया पार पडली. निवडणुकीचे निकाल २३ नोव्हेंबरला लागणार आहेत. राज्यात सरकार स्थापन करण्यासाठी अर्थात बहुमतासाठी एकूण १४५ जागा आवश्यक आहेत. तत्पूर्वी, आता राज्यात पार पडलेल्या मतदानानंतर एक्झिट पोल यायला सुरुवात झाली आहे. यातच नुकताच ‘इलेक्ट्रोल एज’चा पोल समोर आला आहे. यात भारतीय जनता पार्टी (भाजपा) राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरताना दिसत आहे. तर काँग्रेस दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर येताना दिसत आहे. महत्त्वाचे म्हणजे, या पोलमध्ये राज्यात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

‘इलेक्ट्रोल एज’च्या अंदाजानुसर महायुतीतील भाजपा ७८ जागांसह सर्वात मोठा पक्ष अथवा सिंगल लार्जेस्ट पार्टी म्हणून समोर येताना दिसत असला तरी महायुतीला मात्र मोठा फटका बसताना दिसत आहे. महायुतीच्या हातातून राज्यातील सरकार जाताना दिसत आहे. महायुतीतील भाजपच्या ७८ जागांशिवाय शिवसेना (एकनाथ शिंदे) २६ जागा, तर राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार) पान ५ वर

## सुप्रिया सुळेंची सायबर सेलमध्ये तक्रार

**पुणे :** भाजपच्या बिटकॉईन स्कॅमवर राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी पलटवार केला आहे. त्यांनी बिटकॉईन स्कॅमबाबतचे सर्व आरोप फेटाळले असून त्या ऑडिओत माझा आवाज नाही, असे स्पष्ट केले आहे. शिवाय मी सायबर सेलमध्ये तक्रार दाखल केली असून भाजपला मानहानी नोटीस पाठवणार असल्याचे सुप्रिया सुळे एका वृत्तवाहिनीला प्रतिक्रिया देताना म्हणाल्या.

महाराष्ट्रात बुधवारी सकाळी सात वाजल्यापासून विधानसभेच्या मतदानाला सुरुवात झाली आहे. मतदानाच्या पूर्वसंध्येला भाजपने सुप्रिया सुळे यांच्यावर निवडणुकीत परकीय चलन वापरल्याचा आणि अनेक आर्थिक व्यवहारांसाठी बिटकॉईनचा वापर केल्याचा आरोप केला. पुरावे म्हणून रेकॉर्डींग्स आणि स्क्रिनशॉट्स दाखवल्याने खळबळ उडाली होती. मात्र, बिटकॉईन स्कॅमवर सुप्रिया सुळे म्हणाल्या, भाजपचेच हे सारे आरोप आहेत, जे निराधार आहेत. सुप्रिया सुळेंची सर्वात मोठी ताकद तिची इमानदारी आहे. मी मिस्टर सुधांशू त्रिवेंदीसोबत कुठेही बसू शकते. त्यांनी वेळ, जागा ठरवावी, मी सांगतील तिथे आणि सांगतील त्या व्यासपीठावर चर्चा करायला येईन, असे आव्हानच सुप्रिया सुळे यांनी यावेळी केले.

भाजप नेते विनोद तावडे यांच्या पैसै वाटप पान ५ वर

### ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशीनमध्ये बिघाड

रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघातील एक ते दोन ईव्हीएम व व्हीव्ही पॅट मशीनमध्ये बिघाड झाला. परंतु, मतदारांना जास्त वेळ न थांबवता पर्यायी व्यवस्था तातडीने उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली.

### सखी, दिव्यांग केंद्रामुळे उत्सवाचे वातावरण

मतदारांना आकर्षित करण्यासाठी प्रशासनाकडून वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले होते. परंतु, अलिबागमधील नगरपरिषद शाळेच्या मतदान केंद्रात सखी, दिव्यांग, हिरवे तसेच नवमतदार केंद्र उभारण्यात आले होते. या केंद्रामध्ये सजावट केली होती.

## महिला पोलीस कर्मचारी जखमी

### मतदान केंद्रात चक्कर येऊन खाली पडल्याने दुखापत

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

अलिबाग कोळीवाडा येथील केंद्रामध्ये मतदानाची लगबग सुरू होती. दरम्यान, कर्तव्यावर असणाऱ्या एका महिला पोलीस कर्मचाऱ्यांची अचानक प्रकृती बिघडली. त्यांना अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. कर्तव्य बजावत असताना चक्कर आल्याने खाली पडून त्यांच्या डोक्याला दुखापत झाली असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

बुधवारी मतदानासाठी कोळीवाड्यातील एका केंद्रामध्ये सदर महिला पोलिसाची नेमणूक करण्यात आली होती. दुपारी अचानक त्यांची प्रकृती बिघडू लागली. त्यांना चक्कर आली. त्यामुळे उपचारासाठी त्यांना अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले.

या घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्यासह अलिबागचे उपविभागीय अधिकारी विनीत चौधरी आणि पोलीस निरीक्षक किशोर साळे यांनी रुग्णालयात धाव घेतली. म्हात्रे या कर्तव्यावर रुजू झाल्या; परंतु त्यांनी त्याच्या आजारपणावर असलेली गोळी घेतली नाही. त्यामुळे चक्कर येऊन त्या खाली पडल्या. त्यांच्या डोक्याला दुखापत झाली असून, उपचार करून सात टाके मारण्यात आले आहे. सध्या म्हात्रे यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. सध्या या महिला पोलीस कर्मचाऱ्यावर उपचार सुरू असून, डॉक्टरांच्या निगराणीखाली ठेवण्यात आले आहे.

## मंडपाअभावी मतदार उन्हात

जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघातील मतदान बुधवारी २० नोव्हेंबर रोजी दोन हजारांहून अधिक मतदान केंद्रात पार पडले. मतदारांची गैरसोय होऊ नये, त्यांना सुविधा उपलब्ध करण्यात यावेत, अशी सूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांना केली होती. परंतु, अलिबाग विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रांबाहेर मंडप उभारले नसल्याने अनेक मतदारांना उन्हातच रांगेत उभे राहावे लागले. मागील निवडणुकीत उभारण्यात आलेल्या मंडपाचे पैसे न दिल्याने यावेळी मंडपवाल्यांनी ते बांधण्यास नकार दिला. त्याचा नाहक त्रास मतदारांना झाला. जिल्हाधिकारी यांच्या सूचनांचे पालन करण्यास अलिबागचे उपविभागीय अधिकारी अपयशी ठरल्याचे चित्र दिसून आले.

## पोलिसांचा कडेकोट पहारा

मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी जिल्ह्यातील मतदान केंद्रात पोलिसांचा कडेकोट पहारा ठेवण्यात आला. होमगार्ड, आरएसपी विद्यार्थी, वनविभागाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांनीदेखील त्यामध्ये योगदान दिले. मतदान केंद्रापासून शंभर मीटर अंतरावर कोणालाही विनाकारण फिरकू दिले नाही. मतदान केंद्रापासून काही अंतरावर वाहन पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती. दिव्यांग, रुग्ण व ज्येष्ठ नागरिक यांना घेऊन जाणाऱ्या वाहनांना मतदान केंद्रांपर्यंत प्रवेश देण्यात आला होता. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांचा कडकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### गर्दी टाळण्याकरिता पोलिसांकडून शिट्टीचा वापर

## मतदान केंद्राबाहेर शिट्टी जोरात

**| पनवेल | विशेष प्रतिनिधी |**

मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राबाहेर उमेदवारांच्या चिन्हाचा प्रचार न करण्याचा शिरस्ता आहे. बुधवारी मात्र पोलिसांकडूनच अनवधानाने या शिरस्त्याचे उल्लंघन केले जात असल्याचे पाहायला मिळाले.



पनवेल विधानसभा क्षेत्रात भाजपातर्फे चौथ्यादा निवडणूक रिंगणात उतरलेले प्रशांत ठाकूर, शेकापतर्फे निवडणूक लढवत असलेले माजी शिक्षक आमदार बाळाराम पाटील आणि शिवसेना उबाठा गटाच्या उमेदवार माजी नगरसेविका लीना गरड यांच्यात प्रमुख लढत आहे.शेकापचे उमेदवार बाळाराम पाटील यांना शिट्टी हे निवडणूक चिन्ह निवडणूक आयोगाकडून देण्यात आले आहे. प्रचारादरम्यान बाळाराम पाटील यांच्या कार्यकर्त्यांनी शिट्टीच्या जोरदार आवाजात शिट्टीचा प्रचार केला आहे. निवडणुकीच्या प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात प्रचाराच्या तोफा थंडावल्यानंतर उमेदवारांच्या समर्थकांकडून शांततेत प्रचार करण्यात येत होता. मतदारांचा मतदान क्रमांक असलेल्या चिठ्यांच्या माध्यमातून उमेदवारांच्या चिन्हाचा प्रचार केला गेला. दरम्यान, मतदान करण्यासाठी नेमण्यात आलेल्या मतदान केंद्राबाहेर वाहनांची गर्दी होऊ नये याकरिता केंद्राबाहेरील रस्ते वाहतुकीसाठी बंद ठेवून मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मात्र, तरीसुद्धा अनेक वाहन चालक वाहतुकीसाठी बंद असलेल्या रस्त्यावर वाहन दामटण्याचा प्रयत्न करत असल्याने अशा वाहन चालकांना रोखण्यासाठी तसेच गर्दी हटवण्यासाठी पोलीस शिट्टीचा वापर करत असल्याने मतदान केंद्राबाहेर शिट्टी जोरात वाजत होती.







# सोलापुरात गेम पलटला

## सुशील कुमार शिंदे यांचा ठाकरेंना धक्का

**। सोलापूर । प्रतिनिधी ।**
**शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्याने काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. प्रणिती शिंदे या भाजपच्या बी टीम असल्याचा आरोप करण्यात आला आहे. मतदानाच्या दिवशी हा आरोप करण्यात आल्याने चर्चांना उधाण आलं आहे.**



विधानसभा निवडणुकीचं मतदान संपन्न झालं आहे. अशात ऐन मतदानाच्या दिवशी सोलापूरमध्ये गेम पलटला. काँग्रेस नेते सुशीलकुमार शिंदे यांनी अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांना पाठिंबा दिला आहे. सोलापुरात काँग्रेस पक्ष अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांच्या पाठीशी आहे. महाविकास आघाडीतून शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार अमर पाटील देखील निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मात्र महाविकास आघाडीतील काँग्रेस पक्षाचा पाठिंबा अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांना जाहीर केला आहे. याचमुळे शिवसेना ठाकरे गटाचे उपनेते शरद कोळी यांनी सुशील कुमार शिंग आणि प्रणिती शिंदे यांच्यावर जोरदार टीका केली आहे.भाजप उमेदवार सुभाष देशमुख यांना निवडून आणण्यासाठी प्रणिती शिंदे यांनी अपक्ष उमेदवाराला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे अपक्षाला मत म्हणजे भाजपला मत आहे. आपला उमेदवार हा अमर पाटील असून त्यालाच निवडून आणायचे आहे. लोकसभेत भाजपच्या आमदारांनी मदत केल्यामुळे त्यांना निवडून आणण्यासाठी प्रणिती शिंदे यांनी अपक्ष उमेदवाराला पाठिंबा दिला आहे. सुशीलकुमार शिंदे आणि प्रणिती शिंदे यांनी सोलापूरचा विकास केला नाही. शिंदे कुटुंबाने आमचे आभार मानण्याऐवजी पाठीत खंजीर खुपसण्याचे काम केले. ही माणसं धोकेबाज निघाली, गद्दाराकडून काय अपेक्षा करणार, अशा शब्दात शिवसेना ठाकरे गटाचे नेते शरद कोळी यांनी प्रणिती शिंदे यांच्यावर हल्लाबोल केलाय.

### शरद कोळी यांची प्रणिती शिंदेवर टीका

**प्रणिती शिंदे या भाजपच्या बी टीम आहे. भाजपचा प्रचार करतात आणि त्यांची भाजपसोबत आतून हातमिळवणी केली आहे. मात्र शिंदे कुटुंबाची ही शेवटची खासदारकी आहे. यापुढे तुम्हाला खासदारकी मिळणार नाही. शिंदे कुटुंबाने केसाने गळा कापला आहे, असं म्हणत शरद कोळी यांनी प्रणिती शिंदे यांच्यावर हल्लाबोल केला आहे.**

### ठाकरे गट आक्रमक

**शिवसेना ठाकरे गटाचा उमेदवार रिंगणात असताना काँग्रेसने अपक्ष उमेदवाराला पाठिंबा दिल्याने शिवसेना ठाकरे गट आक्रमक झाला आहे. ठाकरे गटाचे उपनेते शरद कोळींची प्रणिती शिंदेंवर सडकून टीका केली आहे. दक्षिण सोलापूरमध्ये काँग्रेसने ठाकरे गटाच्या अमर पाटील यांच्या ऐवजी अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांना पाठिंबा दिला. काँग्रेसच्या या भूमिकेमुळे शिवसेना ठाकरे गटाचे उपनेते शरद कोळी संतापले आहेत.**

# शिर्डीत मतदानासाठी विद्यार्थ्यांचा वापर?

**। शिर्डी । प्रतिनिधी ।**

विधानसभा निवडणुकीत कुठे मतदारांना पैसे वाटपाचा स्कॅम उघड करण्यात आल्याचा दावा करण्यात आला तर काही ठिकाणी उमेदवारांवर हल्ल्याच्या घटना घडल्या.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या एक दिवस अगोदर राज्यात अनेक ठिकाणी पैसे वाटपाच्या घटनांचा आरोप झाला. काही ठिकाणी ईव्हीएम मशीनमध्ये बिघाड झाल्याची तक्रार झाली. तर शिर्डी मतदारसंघात विद्यार्थ्यांकडून मतदान होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. तर राज्यातील इतर पण काही मतदारसंघात उमेदवारांनी मतदारांना वाहनातून आणण्यावर आक्षेप घेतला आहे. शिर्डी विधानसभेत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मतदान केले. लोणी येथे महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी मतदान करत असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. शिर्डी विधानसभेच्या काँग्रेसच्या उमेदवार प्रभावती घोगरे यांनी हा व्हिडीओ व्हायरल केला आहे. विद्यार्थ्यांकडे मतदार ओळखपत्र देखील आढळले आहेत. त्यावर घोगरे यांनी आक्षेप नोंदवला आहे. हे महाविद्यालयीन विद्यार्थी परराज्यातील असून ते लोणी येथील महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत.

शिर्डी विधानसभेत काँग्रेसच्या प्रभावती घोगरे तर भाजपकडुन राधाकृष्ण विखे पाटील यांच्यात लढत होत आहे. निवडणूक आयोगाकडे याविषयीची तक्रार केल्याची माहिती बाळासाहेब थोरात यांनी दिली आहे.

# परळीत शरद पवार गटाच्या कार्यकर्त्याला मारहाण

**। बीड । प्रतिनिधी ।**

राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघातील काही अपवाद वगळता जवळ जवळ सर्वच मतदारसंघात सकाळपासूनच म तदारांनी गर्दी केल्याचे चित्र होते. तर बहुतांश ठिकाणी शांततेत मतदान सुरू असताना काही ठिकाणी काही किरकोळ वाद झाल्याचेही प्रकरण पुढे आले. यामध्ये परळी विधानसभा मतदारसंघांमध्ये बोगस मतदान होत असल्याची तक्रार शरद पवार गटाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी केली आहे. याच दरम्यान परळी शहरातील बँक कॉलनी परिसरामध्ये असलेल्या मतदान केंद्रावर उमेदवार म तदान केंद्रातील माहिती घेत असताना ॲड. माधव जाधव यांना तीन ते चार जणांनी मारहाण केली असल्याचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. यामध्ये मतदान केंद्राबाहेर उभे असताना ॲड. माधव जाधव यांच्यावर हल्ला करण्यात आला. जाधव हे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते आहेत. दरम्यान या प्रकरणामुळे परळी विधानसभा मतदारसंघांमध्ये काहीसा तणाव निर्माण झाला होता.



### मारहाण झाल्यानंतर मतदान केंद्राची तोडफोड

**राष्ट्रवादीचे नेते माधव जाधव यांना परळीमध्ये मारहाण झाल्यानंतर त्याचा पडसाद परळी विधानसभा मतदारसंघातील घाटनांदुर या ठिकाणी दिसला. घटनांदूरमधील मतदान केंद्रामध्ये मतदान चालू असतानाच काही कार्यकर्त्यांनी मतदान केंद्रात घुसून मतदान केंद्र फोडल्याची घटना घडली. काही काळ यामुळे या ठिकाणचे मतदान थांबवण्यात आले होते.**

# बारामतीत कार्यकर्त्यांत जुंपली

## ■ अजित पवारांच्या कार्यकर्त्यांकडून दम दाटी ; शर्मिला पवारांचा आरोप

**। पुणे । प्रतिनिधी ।**

बारामती विधानसभा मतदारसंघात यंदा पवार विरुद्ध पवार असा सामना होत असल्याने हा मतदारसंघ अतिशय संवेदनशील बनला आहे. मतदारसंघात पुतण्या युगेंद्र पवार विरुद्ध काका अजित पवार यांच्यात लढत होत आहे. त्यामुळे, येथील मतदारसंघातील बुथवर दोन्ही कार्यकर्ते समोरासमोर आले होते. युगेंद्र पवार यांच्या मातोश्री शर्मिला पवार यांनी अजित पवारांच्या कार्यकर्त्यांवर दमदाटीचे आरोप केले आहेत. आमच्या कार्यकर्त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली जातेय. दमदाटी करण्यात येत असल्याचा आरोप शर्मिला पवार यांनी केला आहे.

मतदारांना घडाळ्याचे शिक्के असलेल्या स्लीप वाटण्यात येत आहेत. निवडणूक अधिकाऱ्यांकडे आम्ही याची तक्रार करणार असल्याचेही



शर्मिला पवार यांनी म्हटले. त्यावर, आता अजित पवारांनी हे सर्व आरोप फेटाळले असून निवडणूक निर्णय अधिकारी व पोलीस यंत्रणा याबाबत पाहून घेतील, असे सांगितले. बालक मंदिरातील मतदान केंद्रामध्ये अजित पवारांच्या कार्यकर्त्यांकडून दमदाटी व धमकी दिली जात असल्याचा आरोप शर्मिला पवार यांनी केला आहे. अजित पवारांनी यावर प्रतिक्रिया दिली असून तो आरोप धादांत खोटा आहे, सीसीटीव्ही कॅमेऱ्यात सर्वकाही आलं असेल. तसं काही असेल तर निवडणूक निर्णय अधिकारी हे पाहतील. आमच्या कार्यकर्त्यांनी कोणालाही धमक्या दिल्या नाहीत.

# सुहास कांदेंकडून समीर भुजबळांना धमकी

## नाशिकमध्ये भर रस्त्यात राडा

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

विधानसभेच्या मतदान प्रक्रियेला वेग आलेला असतानाच नाशिकमध्ये मात्र काहीशी तणावाची परिस्थिती पाहायला मिळाली.नाशिकच्या नांदगावमध्ये आमदार सुहास कांदे यांनी बोलवलेल्या मतदारांना समीर भुजबळ यांनी अडवलं. ज्यानंतर समीर भुजबळ आणि सुहास कांदे आमनेसामने आले आणि नांदगाव- मनमाड रस्त्यावर एकच गोंधळाची परिस्थिती पाहायला मिळाली.

भुजबळ आणि कांदे समर्थकांमध्ये यावेळी गुरूकुल कॉलेज परिसरामध्ये मतदार निघालेले असताना दोन्ही गटांमध्ये राडा झाला. मतदानासाठी मतदार निघालेले असताना भुजबळांनी वाहनं वाटेत उभी करत त्यांना



अडवलं. परिस्थिती तणावग्रस्त वळणावर येताच तिथं पोलीस आणि निवडणूक आयोगाचं पथक दाखल झालं. थांबवलेल्या मतदारांची यानंतर चौकशी करत त्यांच्या बॅगांचीही तपासणी करण्यात आली. यावेळी दोन्ही नेत्यांनी एकमेकांना शिवीगाळ केल्याचं पाहायला मिळालं. वाढता तणाव पाहता पोलिसांनी इथं तातडीनं अतिरिक्त कुमक मागवली.

भुजबळांनी कांदेंच्या मतदारांना अडवताच नांदगाव-मनमाड रस्त्यावर एकच राडा झाला. कोणत्याही परिस्थितीत मतदार जाऊ देणार नाही, अशी ठाम भूमिका भुजबळांनी घेताच कांदे त्यांच्यासमोर उभे ठाकले. फिक्स है मर्डर...असं म्हणत कांदे गटाकडून भुजबळांना धमकी दिली गेल्याचं पाहायला मिळालं. यावेळी पोलिसांनी मध्यस्थी करत दोन्ही गटांमधील विकोपास गेलेला हा वाद शमवण्यासाठी प्रयत्न केला. या गोंधळादरम्यान मतदारांचाही संताप अनावर झाल्याचं पाहायला मिळालं.



# संजय शिरसाटांची ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांना दमदाटी

। छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी ।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना आमदार संजय शिरसाट यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या कार्यकर्त्याला दम दिल्याचा प्रकार समोर आला आहे. झेंडा उंचावून घोषणा देणाऱ्या ठाकरे गटाच्या कार्यकर्त्याला शिरसाटांनी ममस्ती आली का? एका मिनिटात गायब करेन अशा शब्दात दटावलं.

छत्रपती संभाजीनगर येथील उस्मानपुरा भागामध्ये शिंदे गट आणि ठाकरे गटाचा बूथ समोरासमोर होते. आमदार संजय शिरसाट बूथवर दाखल झाल्यानंतर कार्यकर्त्यांनी घोषणा दिल्या. यावेळी समोर असलेल्या ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी देखील झेंडा उंचावत घोषणा दिल्या. यावेळी संजय शिरसाट ठाकरे गटाच्या बूथवर गेले आणि त्यांनी कार्यकर्त्याला मस्ती आली का? एका मिनिटात गायब करेन, असं म्हणत दम दिला. दरम्यान, या घटनेचा व्हिडिओ मोबाईल कॅमेरामध्ये रेकॉर्ड झाला असून तो समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे.

# मुंबईत कारमध्ये सापडले कोट्यवधी रुपये

## शिंदे गटाच्या नेत्यांवर संशय

। मुंबई । प्रतिनिधी ।

महाराष्ट्रात आज विधानसभा निवडणुकीसाठी मतदान पार पडले. भाजपाचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे यांच्यावर पैसे वाटपाचा आरोप झाला. त्यानंतर शरद पवार यांचे नातू रोहित पवार यांच्या कंपनीच्या एका अधिकाऱ्याला नोटा वाटतान पकडलं. हा वाद थांबलेला नसताना, कॅश कांडच आणखी एक प्रकरण समोर आलंय. इनोवा कारमध्ये कोट्यवधी रुपये सापडले आहेत. गोरेगाव पूर्व दिंडोशी विधानसभेचे शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे उमेदवार संजय निरुपम यांच्याशी संबंधित ही कार असल्याची चर्चा आहे.

ही इनोवा कार मंत्री पार्क सोसायटीच्या समोर उभी होती. यातून रक्कम जप्त करण्यात आली आहे. पोलीस कार जप्त करुन पोलीस स्टेशनला घेऊन गेले आहेत. या कारवर शिंदे गटाच्या नेत्याचा स्टीकर होता. सध्या पोलीस या प्रकरणाची चौकशी करत आहेत. गाडी सापडलेले पैसे कोणाचे आहेत? याचा शोध सुरु आहे. निवडणुकीआधी इतकी मोठी रक्कम का ठेवण्यात आली होती?

याआधी मंगळवारी विनोद तावडे यांच्यावर पैसे वाटपाचा आरोप झाला होता. यावरुन मोठा गदारोळ झाला होता. बहुजन विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी विनोद तावडे यांच्यावर ५ कोटी रुपये आणून वाटल्याचा आरोप केला होता. विनोद तावडे यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. निवडणूक आयोगाने या सर्व प्रकरणाची चौकशी करावी, असं तावडे यांनी म्हटलं आहे. सीसीटीव्ही चेक करावे, त्यानंतर सत्य समोर येईल. नालासोपारा येथे आमदारांची बैठक होती. म्हणून मी आदर्श आचार संहिता आणि वोटिंग मशीन सील करण्याची पद्धत सम जावण्यासाठी गेलो होतो असं तावडे यांनी स्पष्टीकरण दिलं.

शरद पवार यांचे नातू रोहित पवार यांच्या बारामती एग्रो कंपनीचे अधिकारी मोहिते यांना पैसे वाटताना पकडलं. कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघातील मतदारांना आकर्षिक करण्यासाठी नोट वाटप सुरु होतं. या दरम्यान त्यांना पकडलं. मोहितेकडे पोलिसांना एक यादी सुद्धा सापडली आहे. या लिस्टमध्ये सर्व माहिती आहे.

## सात पोलीस तडकाफडकी निलंबित

मुंबई : महाराष्ट्र आणि झारखंड या दोन राज्यात विधानसभेसाठी आज (२० नोव्हेंबर) मतदान पार पडले आहे. या मतदानानंतर निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी लागणार आहे. मात्र, या निवडणुकीबरोबर उत्तर प्रदेशमधील नऊ विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीसाठी मतदान पार पडले. त्यामुळे उत्तर प्रदेशमध्येही निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. मात्र, अशातच सात पोलिसांना तडकाफडकी निलंबित करण्याची कारवाई करण्यात आली आहे.उत्तर प्रदेश पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने केलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर समोर आलेल्या माहितीनुसार, मतदारांना तपासण्यासाठी आणि निवडणुकीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केल्या प्रकरणी सात पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले असल्याची माहिती समोर आली आहे.

# मनोज जरांगे यांचं मराठा समाजाला आवाहन

**। जालना । प्रतिनिधी ।**

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी बुधवारी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. घनसावंगी मतदारसंघात गोरी गंधारी गावात मनोज जरांगे यांनी मतदान केलं. यावेळी त्यांनी मतदारांना आवाहन केले.

मी मैदानात नाही. जनतेच्या हातात आहे. जनतेने अन्याय आणि अत्याचार विसरू नये. अंतरवालीत सामूहिक आमरण उपोषण होणार आहे. अंतरवाली



सराटीत राज्यातील मराठा बांधव सामूहिक उपोषण करणार आहे. सरकार स्थापन झाल्यानंतर सामूहिक उपोषणाची तारीख ठरवू, सरकार कोणतही येऊ द्या, असंही जरांगे यावेळी म्हणाले.

### कालिचरण महाराजांवर टीकास्त्र

**मनोज जरांगे पाटील हिंदुत्व तोडणारा राक्षस, अशा शब्दात स्वयंघोषित कालीचरण महाराज यांनी टीका केली. त्यांच्या या टीकेलाही मनोज जरांगेंनी प्रत्युत्तर दिलं आहे. तो शंभर टक्के राजकीय दलाल आहे. परत बोलला याचा अर्थ तो राजकीय नेत्यांचे पाय चाटतो. त्याला हिंदू धर्माची काही घेणं देणं नाही. याला मराठ्यांचा प्रचंड तिरस्कार आहे. आहे. वढ्या खोड्याला जन्मलेली पैदास आहे ही, अशा शब्दात मनोज जरांगेंनी टीका केली आहे.**

## मेळघाटात मतदानावर बहिष्कार

**अमरावती :** मेळघाटातील रंगूबेली, धोकडा, कुंड, किन्हीखेडा, खोकमार आणि खामदा या सहा गावांमध्ये मतदान केंद्रांवर गावातील एकही नागरिक फिरकला नाही. ग्रामस्थांनी मतदानावर बहिष्कार टाकल्यामुळे या गावातील मतदान केंद्र ओस पडले आहे. ग्रामस्थांनी मतदान करावे, यासाठी प्रशासनाकडून बरेच प्रयत्न करण्यात आले, मात्र ग्रामस्थ आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. या गावांमध्ये एकूण १ हजार ३०० मतदार आहेत. गावामध्ये रोड, पाणी, नाल्या, वीज या संदर्भात समस्या आहेत. या समस्या न सुटल्यामुळे नागरिक आक्रमक झाले आहेत. आधी सोयी सुविधा द्या, मग मतदान मागायला या अशी भूमिका गावकऱ्यांनी घेतली आहे.

## पृथ्वीराज चव्हाणांचा हल्लाबोल

# मोदी-शाह यांच्या आशिर्वादानेच राज्यात पैसे वाटप

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
**राज्यात पैसे वाटपाचा प्रकार मोदी-शाह यांच्या आशीर्वादानेच सुरु असल्याचा आरोप पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. विधानसभेतील पराभवाचे खापर फोडण्यासाठी भाजपच्याच मोठ्या नेत्याने विनोद तावडेंबाबत माहिती दिल्याचेही चव्हाण यांनी म्हटले आहे. तर मनोज जरांगे पाटील यांनी आपल्याला फोन करून शुभेच्छा दिल्याचे पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.**

राज्यभर निवडणूक जिंकण्यासाठी भाजपाकडून वारेमाप पैसा वापरला जात आहे. कराड दक्षिणेत दोन दिवसापूर्वी पैसै वाटताना एकाला पकडले आहे. सत्ता अबाधित ठेवण्यासाठी मोदी-शाह यांच्या आशीर्वादने हा प्रकार सुरु असल्याचा आरोप पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. निवडणुकीनंतर भाजपाचा पराभव झाल्यास विनोद तावडेंवर पराभवाचे खापर फोडले जाईल आणि चुकून भाजपाचा विजय झाला तर विनोद तावडेंना मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीतून बाहेर काढण्यासाठी हा प्रयत्न चालला असून भाजपाचा अंतर्गत प्रश्न असल्याचे पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.



### मनोज जरांगे पाटील यांनी दिल्या शुभेच्छा

मनोज जरांगेनी मला शुभेच्छा दिल्या असून मला श्रेयवादात, राजकारणात पडायचे नाही. दुपारी ३.३० वाजता मनोज जरांगे यांचा फोन आला असल्याचे पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हंटले आहे. सातारा जिल्ह्यात विधानसभेचे आठ मतदारसंघ आहेत. कराड दक्षिण हा सातारा जिल्ह्यातील महत्त्वाचा विधानसभा मतदारसंघ आहे. कारण, या मतदारसंघातून राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि ज्येष्ठ काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण आमदार आहेत. या विधानसभा मतदारसंघातून ते तिसऱ्यांना निवडणूक लढवत आहेत. पृथ्वीराज चव्हाण यांनी गेल्या दोन विधानसभा निवडणुकीत विजय मिळवला आहे. तर, दुसरीकडे महायुतीकडून भाजपचे अतुल भोसले हे निवडणूक लढवत आहेत. अत्यंत चुरशीची ही लढत होण्याची शक्यता आहे.

### भाजप नेते विनोद तावडेसह भाजपवर जोरदार टीका

**विरारमध्ये भाजप नेते विनोद तावडे यांनी पैसे वाटल्याच्या आरोपाचं प्रकरण सुरु होते. बहुजन विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी ही आरोप केला होता. विनोद तावडे ज्या हॉटेलमध्ये थांबले होते त्या हॉटेलला शेकडो कार्यकर्त्यांनी घेराव घातला होता. त्यामुळे बराच काळ गदारोळ झाला. त्यानंतर पोलिसांनी विनोद तावडे यांना सुरक्षित बाहेर काढले आहे. हॉटेलमध्ये ९ लाखांची रोकड जप्त करण्यात आली. याप्रकरणावरुन विरोधकांकडून विनोद तावडे आणि भाजपवर जोरदार टीका होताना दिसत आहे.**

## शाई पुसट झाल्याच्या तक्रारी

**ठाणे :** विधानसभा निवडणुकीत मतदान केल्यावर लावण्यात येणारी ओळख शाई पाण्याने धुतली असता, पुसट होत असल्याच्या तक्रारी मतदारांकडून करण्यात आल्या. ठाणे जिल्हा विधानसभा मतदारसंघातील कोपरी पाचपाखाडी, ठाणे शहर, अंबरनाथ, नवी मुंबई आणि मुरबाड मतदारसंघातील अनेक मतदारांच्या बोटावरील शाई पुसट झाल्याची बाब मतदारांनी सांगितली. लोकसभा निवडणुकीच्यावेळी मतदार याद्यांमधून मतदारांची नावे गायब होणे, मतदानकेंद्र बदलणे, तसेच काही तांत्रिक अडचणी, अशा अनेक समस्यांना मतदारांना सामोरे जावे लागले होते.

# उत्सव लोकशाहीचा...




● पनवेल- मतदारांना मतदान करणे सुलभ व्हावे, यासाठी प्रशासनाकडून जोख व्यवस्था करण्यात आली होती. दरम्यान, बहुतांश मतदान केंद्रांवर सेल्फी पॉईंट उभारण्यात आला होता. यावेळी मतदारांनी मतदान केल्यानंतरची आपली छबी याठिकाणी काढल्याचे दिसून आले. त्याचप्रमाणे मतदारांना आकर्षक करण्यासाठी अनेक ठिकाणचे मतदार केंद्रे आकर्षक रंगरंगोटी करुन सजविण्यात आली होती. लोकशाहीचा हा उत्सव आनंदाने साजरा व्हावा, यासाठी जिल्हाभरातील प्रशासन कामाला लागल्याचे प्रत्येक ठिकाणी दिसून आले. (छायाचित्र- राजेश डांगळे)



● (छायाचित्र : अमोल नाईक)

अलिबाग





● अलिबाग-मुरुड-रोहा मतदारसंघासाठी बुधवारी मतदान पार पडले. यावेळी या मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई यांनी मतदानाला जाण्याआधी देवीदेवतांचे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्यासमवेत शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे उपस्थित होत्या. त्यानंतर चित्रलेखा पाटील यांनी मतदान केले. दरम्यान, मतदारसंघातील विविध मतदान केंद्रांवर मतदानासाठी नागरिकांनी गर्दी केल्याचे चित्र दिसून आले. यावेळी नवमतदारांसह ज्येष्ठ, दिव्यांग तसेच महिलांनी मोठ्या संख्येत उपस्थित राहून आपला मतदानाचा हक्क बजावला. मतदानाच्या पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त करण्यात आला होता. (छायाचित्र : समीर मालोदे)

पनवेल




● पनवेल ग्रामीण

मुरुड



● मुरुड-अलिबाग मतदारसंघात खारआंबोळी येथे सकाळी मतदानाचा हक्क बजावताना लांबच लांब रांगा होत्या. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# भाजपचा धीर सुटला

निवडणूक इतकी चुरशीची होती की ठिकठिकाणी तणाव उद्भवणार, आरोप होणार हे अपेक्षित होते. त्यानुसार अनेक ठिकाणी काही काळ वाद झाले. बारामतीमध्ये वातावरण तापवण्याचे प्रकार झाले. इतरत्र काही ठिकाणी आणखी काही घटना घडल्या. पण मतदान सर्वसाधारणपणे शांतपणे पार पडले. मतदानाची सर्व आकडेवारी येण्यास थोडा वेळ लागेल. मात्र यावेळी अनेक ठिकाणी निरुत्साह दिसला. सलग सुट्ट्या घेतल्या तर लोक बाहेर पळतात असे कारण देऊन मधल्या वारी मतदान घेतले गेले. पण प्रमुख दोन आघाड्या, इतर असंख्य छोटे गट, अपक्ष आणि बंडखोर यांच्यामुळे इतका गोंधळ निर्माण झाला की मतदार बहुदा त्याला कंटाळले असावेत. शिवाय, या सर्व गट-तटांमध्ये चालू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांनी इतकी खालची पातळी गाठली की पुरोगामी व विचारी म्हणवला जाणारा महाराष्ट्र तो हाच का असा प्रश्न पडावा. असो. आता मतदारांचा फैसला यंत्रात बंद झाला आहे. आता मतदानाच्या प्रमाणावरून सर्व पक्ष काही ना काही अंदाज बांधतील. यावेळी खरे राजकारण २३ नोव्हेंबरनंतर म्हणजे निकालांनंतर सुरू होईल असे बोलले जात होतेच. त्याची तयारी सुरू होईल. दरम्यान, निवडणुकीत आपल्याला फटका बसणार असल्याचा अंदाज मतदान होण्यापूर्वीच भाजपला आलेला असावा असे मतदानाच्या आदल्या दिवशी घडेलेल्या काही घटनांवरून म्हणता येते. विशेषतः विरारमध्ये विनोद तावडे जिथे थांबले होते त्या हॉटेलात पैशांच्या थप्प्या सापडल्याने भाजप कोणत्या थराला जाऊन निवडणूक लढवत आहे हे स्पष्ट झाले. तावडे यांचे म्हणणे असे की, ते पालघरहून येताना वाटेत थांबले होते व मतदानासंबंधात कार्यकर्त्यांशी चर्चा करीत होते. याउलट ते पैसे वाटत होते असे त्यांचे विरोधक बहुजन विकास आघाडीचे हितेंद्र ठाकूर यांचे म्हणणे आहे. त्यांचे चिरंजीव व नालासोपारा मतदारसंघातील उमेदवार क्षितिज ठाकूर यांनी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी तावडे यांच्या हॉटेलात छापा टाकला व पुढे काय घडले हे सर्व महाराष्ट्राने टीव्हीवर लाईव्ह पाहिले.

## लपवाछपवी संशयास्पद

मतदानाच्या वेळी बूथमधील प्रतिनिधींनी कशा सह्या करायच्या असतात वगैरे आपण सांगत होतो असे तावडे यांचे म्हणणे आहे. हा दावा अत्यंत हास्यास्पद आहे. तावडे भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस आहेत. त्यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याला पक्षाने असल्या कामी खर्ची घालावे हेच आश्चर्यकारक आहे. सुमारे दहा लाख रुपये सापडले हे सत्य आहे. पोलिसांनी त्याबाबत तक्रारही दाखल केली आहे. आता हे पैसे कोणाचे हा खरा प्रश्न आहे. प्रकार उघडकीस आल्यावर या पैशांचे आईबाप नाहीसे झाले असे दिसते. आता तावडे म्हणतात चौकशी होऊद्या. भाजपवाले म्हणतात हितेंद्र ठाकूर यांच्या कार्यकर्त्यांनीच हे कारस्थान रचले. उलट ठाकूर यांच्या कार्यकर्त्यांनी पैशांच्या बॅगा, पाकिटे हे कॅमेऱ्यावर दाखवले. शिवाय, तावडे यांच्याकडून त्यांनी काही डायऱ्याही पळवल्या. या डायऱ्यांमध्ये अनेकांची नावे असून त्यांच्यापुढे संशयास्पद आकडे लिहिलेले होते. ते आकडे तीन लाख, पाच लाख असे होते असे ठाकूर यांचे म्हणणे आहे. या डायऱ्यांचे शूटिंग आता सर्वत्र व्हायरल झाले आहे. त्यामुळे यात काहीतरी पाणी मुरते आहे हे नक्की. या हॉटेलच्या काही खोल्यांमधून बरेच पैसे जप्त केल्याचे म्हणतात. हे प्रकरण मिटवून टाका असे आपल्याला पन्नास फोन आल्याचे हितेंद्र ठाकूर म्हणाले. शिवाय मला माफ करा आणि जाऊद्या अशी विनवणी त्यांच्याकडे करीत असल्याचे कॅमेऱ्यावर दिसले आहेच. तावडे यांची बाजू सच्ची असती तर त्यांनी याचा पंचनामा करण्याचा आग्रह धरायला हवा होता. ते तिथून पळून का जाऊ पाहात होते या यातला कळीचा प्रश्न आहे. भाजपचे उमेदवार राजन नाईक हे तर एका खोलीचे दार लावून बराच काळ लपून बसले होते असे म्हणतात. केंद्रात व राज्यात ज्या पक्षाचे गृहमंत्री आहेत व जे स्वतःला स्वच्छ म्हणवतात त्या भाजपच्या नेत्यांनी अशी लपवालपवी करावी हेच पुरेसे बोलके आहे.

## अंतर्गत साठमारी

या प्रकरणाला भाजपमधील अंतर्गत राजकारणाचीही किनार आहे. देवेंद्र फडणवीसांनी मुद्दामच विनोद तावडे यांचा जाहीर पाणउतारा करवला असे म्हटले जाते. तावडे हे पूर्वापार मुख्यमंत्रिपदाचे इच्छुक होते. गेल्या वेळी त्यांचे तिकिट कापले गेले. मग त्यांना दिल्लीला पाठवले गेले. तिथे त्यांनी अमित शाह यांच्याशी जमवून घेतले. आता निवडणुकांसाठी परत आल्यावर ते पुन्हा मुलाखती देऊन मुख्यमंत्री कोणीही होऊ शकतो असे म्हणू लागले होते. त्यांना धडा शिकवण्यासाठी देवेंद्रांनीच हा बनाव घडवून आणला की काय अशी शंका घ्यायला भरपूर जागा आहे. याची अनेक कारणे आहेत. भाजपच्या इतक्या वरिष्ठ नेत्याला बहुजन विकास आघाडीचे कार्यकर्ते चोर, चोर म्हणून जवळपास तीन तास अडकवून ठेवतात व त्यांची सुटका करण्यासाठी फडणवीसांच्या अखत्यारीत असलेले पोलिस काहीही हालचाल करीत नाहीत हेच मुळात आश्चर्यकारक आहे. दुसरे म्हणजे या संपूर्ण चार तासांच्या काळात भाजपचे किंवा शिंदे गटाचे स्थानिक नेते येथे धावून आलेले दिसले नाहीत. शिवाय, कहर म्हणजे, तावडे यांना रंगेहाथ पकडल्याचा दावा केल्यानंतर काहीच मिनिटांनी ठाकूर पितापुत्रांनी त्यांना आपल्या गाडीतून मुंबईत पोचवले. या दरम्यान, ठाकूर यांच्यासोबत एक संयुक्त पत्रकार परिषद घेण्याचा तावडे यांनी प्रयत्न केला व त्यापूर्वी त्यांची ठाकूर यांच्यासोबत बंद दाराआड चर्चाही झाली. शिवाय इकडे हा गोंधळ चालू असतानाच तिकडे डहाणूमध्ये ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीच्या उमेदवाराने मतदानाला काही तास बाकी असताना एकाएकी माघार घेतली व भाजपच्या उमेदवाराला पाठिंबा जाहीर केला. हा सर्वच प्रकार संशयास्पद आहे. पैसे वाटणे, उमेदवारांना धमकावणे, अनिल देशमुख यांच्यासारख्यांना मारहाण करणे यासारख्या सर्वच प्रकारांमध्ये संशयाची सुई भाजपकडे आहे. त्यावरून या पक्षाच्या पायाखालची वाळू सरकू लागल्याचे दिसते. उद्या सत्ता सोडावी लागेल तेव्हा तर ते आणखी हैदोस घालतील.

विचार

# वाढतेय बेकायदेशीर स्थलांतरितांची संख्या

***टीआयएसएसच्या ताज्या अंतरिम अभ्यास अहवालानुसार मुंबईतील बांगलादेशी आणि रोहिंग्या समुदायांच्या वाढत्या संख्येचा गंभीर सामाजिक आणि आर्थिक परिणाम होत आहे. काही राजकीय संघटना व्होट बँकेच्या राजकारणासाठी या अवैध स्थलांतरितांचा वापर करत असल्याचेही बोलले जात आहे. २०५१ पर्यंत हिंदू लोकसंख्या ५४ टक्क्यांपर्यंत कमी होईल, अशी भीती या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे.***



**मेधा इनामदार**

भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत नमूद केले आहे की भारत एक धर्मनिरपेक्ष राज्य आहे आणि भारतीय राज्यघटनेने धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार मूलभूत अधिकार म्हणून घोषित केला आहे. भारतीय राज्यघटनेनुसार भारत हा कोणताही धर्म नसलेला धर्मनिरपेक्ष देश आहे. १९७६ मध्ये लागू करण्यात आलेल्या भारतीय राज्यघटनेच्या चाळीसाव्या दुरूस्तीने भारताच्या राज्यघटनेच्या प्रस्तावनेत हा धर्मनिरपेक्ष देश असल्याचे प्रतिपादन केले आहे. आज भारताची लोकसंख्या अंदाजे १४१ कोटी इतकी आहे. जगातील बहुतेक सर्व देशांमध्ये दर दहा वर्षांनी जनगणना केली जाते. २०२१ मध्ये कोरोनाने सारे जग ठप्प झाले होते. त्यामुळे त्या वर्षी जनगणना होऊ शकली नाही. त्यानंतर काही देशांनी जनगणनेचे काम पूर्ण केले. परंतु भारतात जातीनिहाय जनगणनेची मागणी सुरू झाल्यामुळे त्याविषयीचा निर्णय अद्याप घेतला गेला नाही. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील ७९.८ टक्के लोक हिंदू धर्माचे पालन करतात. भारतात इस्लामधर्मीयांची संख्या १४.२ टक्के आहे तर एकूण लोकसंख्येच्या २.३ टक्के ख्रिश्चन, १.७ टक्के शीख, ०.७ टक्के बौद्ध तर ०.४ टक्के लोक जैन धर्माचे अनुसरण करतात. झोरोस्ट्रिअन धर्म आणि यहुदी धर्माचे लोकदेखील भारतात निवास करतात. या धर्मांचे हजारो अनुयायी भारतात आहेत आणि ते स्वतःला भारतीय मानतात. भारतामध्ये झोरोस्ट्रियन म्हणजे पारशी आणि बहाई धर्माचे पालन करणाऱ्यांची लोकसंख्या जगात सर्वाधिक आहे. त्याशिवाय आणखीही काही धर्मपंथाचे लोक भारतात राहतात.

नुकताच टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसने यासंदर्भात केलेल्या अभ्यासाचा एक अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. या संस्थेने मुंबईसह राज्याच्या लोकसंख्याविषयक समस्यांचा सखोल अभ्यास केला. या अहवालातून त्यांनी काही निरीक्षणे नोंदवली आहेत. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस ही एक सामाजिक संस्था आहे आणि समाजहिताच्या दृष्टीने कार्य करत असते. गेल्या काही वर्षांमध्ये महाराष्ट्रात बेकायदा स्थलांतरितांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. मुंबईसारख्या अनेक मोठ्या शहरांमध्ये झोपडपट्ट्यांची संख्या, बेरोजगारी आणि बाहेरील देशांमधून अनधिकृतपणे भारतात निवास करणाऱ्या लोकांची संख्या सातत्याने वाढत चालली आहे. त्यातच या बेकायदा स्थलांतरितांचे प्रश्न मोठ्या प्रमाणावर पुढे येऊ लागले आहेत. त्याच वेळी या विषयाचे गांभीर्य ठळक करणारा हा धक्कादायक अहवाल समोर आला आहे. मुंबईतील हिंदू लोकसंख्या २०५१ पर्यंत ५४ टक्क्यांनी कमी होईल आणि स्थलांतरित बांगलादेशी आणि रोहिंग्यांची संख्या वाढेल, असे चित्र या अहवालातून स्पष्ट झाले आहे. या अहवालानुसार १९६१ पासून आतापर्यंत हिंदूंची लोकसंख्या ८८ टक्क्यांवरून २०११ मध्ये ६६ टक्के झाली तर १९६१ मध्ये आठ टक्के असलेली मुस्लिम लोकसंख्या २०११ मध्ये २१ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. असा अंदाज आहे की २०५१ पर्यंत हिंदू लोकसंख्या ५४ टक्के कमी होईल तर मुस्लिम लोकसंख्या सुमारे ३० टक्के वाढेल.

कागदपत्र नसलेले बेकायदेशीर स्थलांतरित कशा प्रकारे बनावट मतदार ओळखपत्र मिळवत आहेत, हे देखील या अहवालात उघड झाले आहे. भारतातील अग्रगण्य सामाजिक विज्ञान संस्था आणि भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस'च्या अंतरिम अभ्यास अहवालात अनेक धक्कादायक खुलासे आणि निष्कर्ष समोर आले आहेत. हा अहवाल सांगतो की मुंबईत बांगलादेश आणि म्यानमारमधील बेकायदेशीर स्थलांतरितांची (बहुतांश मुस्लीम) संख्या वाढत आहे. काही राजकीय पक्ष त्यांचा वापर व्होट बँकेच्या राजकारणासाठी करत आहेत. दुसरीकडे, मराठी मुस्लिम सेवा संघ आणि १८० पेक्षा अधिक स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने मुस्लिम समुदायामध्ये मतदार नोंदणीला चालना देण्याचे कार्य सक्रियपणे चालू आहे. या गटाने राज्यभरातील मुस्लिम मतदारांसाठी बैठका आणि माहिती सत्रांचे आयोजन केले आहे. या माध्यमातून 'मत जागृती' पसरवण्याच्या नावाखाली विशिष्ट पक्षाला मतदान करण्याचे आवाहन केले जाते आहे. भारतात फार पूर्वीपासून विविध धार्मिक श्रद्धा आणि पद्धती स्वीकारल्या गेल्या आहेत. भारताच्या संपूर्ण इतिहासात धर्म हा देशाच्या संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग आहे. विशेष म्हणजे भारतीय उपखंड हे जगातील चार प्रमुख धर्मांचे जन्मस्थान आहे. बौद्ध, हिंदू, जैन आणि शीख धर्म हे एकत्रितपणे मूळ भारतीय धर्म म्हणून ओळखले जातात. किंबहुना, हिंदू धर्म हेच या धर्मांचे उत्पत्तीस्थान आहे.

टीआयएसएसच्या अंतरिम अहवालात म्हटल्याप्रमाणे गेल्या काही वर्षांमध्ये मुंबई शहरात स्थलांतरितांचा प्रश्न मोठे रूप घेतो आहे. संस्थेचे प्र-कुलगुरु शंकर दास आणि सहाय्यक प्राध्यापक सौविक मंडल यांच्या टीमने हा अभ्यास केला आहे. या अभ्यासात एकूण तीन हजार स्थलांतरितांशी चर्चा केली गेली. अर्थातच या अंतिम अहवालात केवळ ३०० लोकांशी केलेल्या चर्चेचा आधार घेतला आहे. पूर्ण अहवाल सादर करण्यासाठी अजून काही काळ लागेल. परंतु हा अंतरिम अहवालातूनच इतके गंभीर चित्र पुढे आले आहे की अत्यंत तातडीने या विषयाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. बांगलादेशी रोहिंग्या मुंबईत बेकायदेशीर स्थलांतरित म्हणून स्थायिक झाले आहेत. ते हवाई मार्गाने नव्हे तर सीमा ओलांडून आले आहेत. या लोकांनी अवलंबलेल्या मार्गाविषयी चौकशी केली असता आढळलेले वास्तव खरोखरीच आश्चर्यकारक आहे. प्रथम कुटुंबातील एक सदस्य इकडे येतो आणि काही काळातच संपूर्ण कुटुंब येथे स्थलांतरित होते. यात म्यानमारमधून स्थलांतरित होणाऱ्यांची संख्याही लक्षणीय आहे. त्यांच्यामुळे झोपडपट्ट्यांमध्ये गर्दी वाढली आहे. परिणामी, आधीच ताणलेल्या पायाभूत सुविधांवर अधिक ताण येत आहे. मुंबईतील आरोग्यसेवा, स्वच्छता, शिक्षण, पाणी, वीज यासारख्या सेवांवर परिणाम होत आहे. मानखुर्द, गोवंडी, कुर्ला या ठिकाणी अपुऱ्या पाणी आणि वीज पुरवठ्यामुळे जनजीवन विस्कळीत होत आहे.

स्थानिक लोक आणि स्थलांतरित यांच्यातील आर्थिक विषमतेमुळे सामाजिक तणाव आणि हिंसक संघर्ष वाढत आहे. या अभ्यासात समाविष्ट असलेल्या ५० टक्के महिलांची तस्करी करण्यात आली होती. त्यांना वेश्याव्यवसायात गुंतवले गेले होते. टीआयएसएसच्या अहवालात असेही नमूद करण्यात आले आहे की या बांगलादेशी स्थलांतरितांपैकी चाळीस टक्के लोक दर महिन्याला दहा हजार ते एक लाख रुपये मायदेशी पाठवत असतात. या बेकायदेशीर स्थलांतरितांची संख्या मानखुर्द, भिवंडी, मुंब्रा आणि मीरा रोड या ठिकाणी अधिक आहे. त्यांना मध्यपूर्वेतील काही बोगस एनजीओजकडून खोटी मतदान ओळखपत्रे, रेशन कार्ड आणि आधार कार्ड बनवून दिली जातात. हा अहवाल निवडणुकीच्या काळात प्रसिद्ध झाल्यामुळे सर्वच राजकीय पक्ष एकमेकांवर चिखलफेक करत आहेत. परंतु एकमेकांवर आरोप करून हा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी सर्वच पक्षांनी गांभीर्याने विचार केला पाहिजे. बेकायदा स्थलांतरित होणाऱ्या लोकांना नव्या देशाविषयी कोणत्याही प्रकारचे ममत्व नसते. त्यांना आपल्या देशाच्या स्वास्थ्य आणि सुव्यवस्थेशी देणेघेणेही नसते. त्यांना समाजहितामध्ये काहीही रस नसतो. ते येताना आपली संस्कृती घेऊन आलेले असतात. हवे ते सहज न मिळाल्यास ते धाक आणि दहशत माजवायलाही कमी करत नाहीत.

स्थानिक लोकांची सहनशक्ती संपेपर्यंत हे प्रश्न फारसे गंभीर वाटत नाहीत. परंतु शिक्षण, नोकऱ्या आणि इतर सर्व सामाजिक सेवांची कमतरता या बाहेरून आलेल्या लोकांमुळे होते आहे हे ध्यानी आले की स्थानिक लोक अस्वस्थ होतात. त्यांच्यात संघर्ष सुरू होतो. दुर्दैवाने या लोकांमध्ये मुस्लिमांची संख्या अधिक असल्यामुळे हा प्रश्न सामाजिकतेवरून कधी धर्मविषयक होऊन बसेल हे कुणाच्याही ध्यानी येणार नाही. असे झाल्यास त्यातील गुंतागुंत अधिक वाढू लागेल. दरम्यान, जातीय तेढ निर्माण करण्यासाठी टपून असलेल्या देशांतर्गत आणि परदेशी शत्रूंची संख्या भारतामध्ये कमी नाही. त्यामुळेच हा प्रश्न धर्माधिष्ठित करून राजकीय पोळी भाजून घेण्यापेक्षा नजिकच्या भविष्यात त्यातून निर्माण होणारे धोके ओळखून सर्वपक्षीयांनी एकत्र येऊन या प्रश्नाचा सामना केला तर देशहितासाठी ते नक्कीच लाभदायक ठरेल.

आजकाल

# गुजरातेतील भयंकर गंभीर रॅगिंगचा प्रकार

१६ ते १७ नोव्हेंबरच्या मध्यरात्री गुजरातमधील वैद्यकीय महाविद्यालयातील वसतिगृहात एका विद्यार्थ्याचा वरिष्ठ विद्यार्थ्यांनी रॅगिंग केल्यामुळे मृत्यू झाला. गुजरात मेडिकल एज्युकेशन अ‍ॅण्ड रिसर्च सोसायटी (GMERS) मेडिकल कॉलेजचा अनिल मेथनिया (वय १८) हा विद्यार्थी एमबीबीएसच्या प्रथम वर्षाला होता. गुजरातमधील पाटण जिल्ह्यातील पोलिसांनी मेथनियाच्या १५ वरिष्ठ व्यक्तींवर हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्यावर भारतीय न्याय संहिता (बीएनएस)अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. रॅगिंगविरोधी समितीच्या अहवालानंतर वैद्यकीय महाविद्यालयाने संबंधित सर्व १५ जणांना निलंबितही केले होते. आता त्या विद्यार्थ्याच्या मृत्यूसंबंधित प्रकरणाचा तपास सुरू आहे. पोलिसांनी महाविद्यालयाकडून अँटी रॅगिंग अहवाल मागवला आहे.

मेथनियाने नीट परीक्षेत कोणत्याही कोचिंग क्लासचा आधार न घेता, ५५० गुण मिळवले होते. तो सुमारे चार तास एकाच ठिकाणी उभा राहिल्यानंतर १६ नोव्हेंबर रोजी तो बेशुद्ध पडला. मृत्यूच्या अवघ्या एक महिन्यापूर्वी १४ ऑक्टोबर रोजी तो कॉलेजमध्ये दाखल झाला होता. गुजरातमधील कच्छच्या छोट्या रणजवळील सुरेंद्रनगरच्या ध्रंगध्रा तालुक्यातील जेसाडा गावातील ही परीक्षा उत्तीर्ण करणारा तो एकमेव विद्यार्थी होता. ''तो हुशार विद्यार्थी होता. तो कोणत्याही कोचिंग क्लासला गेला नाही; पण तरीही तो नीट परीक्षा उत्तीर्ण होण्यात यशस्वी ठरला. त्याने नीटच्या परीक्षे मध्ये ५५० आणि गुजरात कॉमन एन्ट्रन्स टेस्टमध्ये ९०.५७ टक्के गुण मिळवले,'' असे त्याचा चुलतभाऊ गौतम मेथानिया यांनी सांगितले.

वसतिगृहातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी शनिवारी रात्री प्रथम वर्षाच्या १० हून अधिक विद्यार्थ्यांचे रॅगिंग केल्याचा आरोप आहे. ''आम्ही जिथून आलो, त्या प्रदेशाच्या आधारावर, आम्हाला रात्री ९ च्या सुमारास वसतिगृह ब्लॉकमध्ये जमण्यास सांगण्यात आले. व्हॉट्सअ‍ॅप स्टुडंट ग्रुपवर याची माहिती देण्यात आली. तीन तासांहून अधिक काळ उभे राहिल्यानंतर आम्हाला आमचा परिचय देण्यास सांगण्यात आले,'' असे पहिल्या वर्षाच्या एका विद्यार्थ्याने 'दी इंडियन एक्स्प्रेस'ला सांगितले. वरिष्ठांनी ज्युनियर्सना उभे केले. बराच वेळ उभा राहिल्यानंतर एक विद्यार्थी बेशुद्ध पडला, असे विद्यार्थ्याने सांगितले. १८ नोव्हेंबर रोजी सकाळी १२.३० वाजता बालिसणा पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या एफआयआरनुसार, अधिष्ठाता हार्दिक शाह यांनी ताबडतोब अँटी रॅगिंग समितीला बोलावले; ज्यामध्ये त्यांचे अध्यक्ष आणि इतर प्राध्यापकांचा सदस्य म्हणून समावेश होता.

समितीने संकलित केलेल्या अहवालात २६ साक्षीदारांचे जबाब आहेत, त्यापैकी ११ साक्षीदारांनी समितीसमोर साक्ष दिली. 'दी इंडियन एक्स्प्रेस'ने दिलेल्या वृत्तानुसार, अटक केलेल्या १५ जणांनी त्यांना सतत उभे राहण्यास, गायला आणि नाचण्यास सांगून रॅगिंग केल्याचे त्यांनी सांगितले. मेथनिया बेशुद्ध पडला आणि त्याला तत्काळ वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न सर्वसाधारणा रुग्णालयामध्ये नेण्यात आले. अधिष्ठाता म्हणाले की, मेथनिया याला काही विद्यार्थ्यांनी बेशुद्धावस्थेत धारपूर रुग्णालयाच्या आपात्कालीन विभागात आणले गेले आणि नंतर त्याला मृत घोषित करण्यात आले, असे 'दी इंडियन एक्स्प्रेस'च्या वृत्तात नमूद करण्यात आले आहे.

२००१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने देशभरात रॅगिंगवर बंदी घातली होती. परंतु २००९ मध्ये धर्मशाळेत अमन कचरू या वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याचा रॅगिंगमुळे मृत्यू झाल्याने न्यायालयाने सर्व शैक्षणिक संस्थांना रॅगिंगविरोधी कायद्यांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आदेश दिले. रॅगिंग हे रॅगिंग प्रतिबंधक कायदा, १९७७ आणि त्यातील सुधारणांच्या कक्षेत येते. ''एखाद्या विद्यार्थी किंवा विद्यार्थिनीने तोंडी किंवा लिखित स्वरूपात त्रास देणे, गैरवर्तन करणे किंवा यासारख्या क्रियाकलापांमध्ये गुंतणे,'' अशी कायद्याने रॅगिंगची व्याख्या केली आहे. रॅगिंगमध्ये दोषी आढळणाऱ्या कोणत्याही विद्यार्थ्याला कायद्यानुसार तीन वर्षांचा तुरुंगवास आणि दंड भरावा लागतो. कायद्याचे पालन न करणाऱ्या किंवा या प्रकरणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या महाविद्यालयांवर कायदेशीर कारवाई केली जाते. भारतातील उच्च शिक्षण नियामक विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये सर्व प्रकारच्या रॅगिंगवर बंदी घातली आहे. कोणत्याही स्वरूपातील रॅगिंगकडे दुर्लक्ष करणाऱ्यांना दंड ठोठावण्यात आला आहे.

नियमांनुसार, विद्यार्थ्याचा पेहराव किंवा त्याच्या स्वाभिमानावर कोणतीही टिप्पणी केली, तर ती रॅगिंग मानली जाते. एखाद्या विद्यार्थ्याचा प्रदेश, भाषा, वंश व जात यांच्या आधारे अपमान करणे हेही रॅगिंगमध्ये येते. कोणत्याही विद्यार्थ्याला कोणतेही काम करण्यास भाग पाडले, तर तेही रॅगिंगच्या कक्षेत येते. एआयसीटीई कायदा, १९८७ च्या कलम २३ व कलम १० अन्वये, रॅगिंग रोखण्यासाठी एक ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन विनियम २००९ आहे, जे भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम, १९५६ च्या कलम ३३ मधील आहे. 'यूजीसी'ने एक टोल क्रमांकही जारी केला आहे. रॅगिंगविरोधी मोफत हेल्पलाइन क्रमांक १८००-१८०-५५२२ वर पीडित व्यक्ती १२ भाषांमधून आपली तक्रार नोंदवू शकते.

लोकसंसद

## आता आरबीआयचा 'डीपफेक' व्हिडिओ! सावधान!

खुद्ध भारतीय रिझर्व बँकेच्या (आरबीआय) गव्हर्नरांकडून रिझर्व बँकेच्या काही गुंतवणूक योजनामध्ये गुंतवणूक करण्याचा सल्ला दिला जात असल्याचा डीपफेक तंत्रज्ञानाद्वारे तयार केलेला व्हिडिओ सध्या समाज माध्यमावर मोठ्या प्रमाणात वायरल झाला आहे. मुळातच रिझर्व बँक अशा कुठल्याही प्रकारच्या गुंतवणूक योजनांमध्ये कुणालाही गुंतवणूक करण्याचा सल्ला देत नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या फेक व्हिडिओपासून नागरिकांनी आणि गुंतवणूकदारांनी सावध राहावे असे रिझर्व बँकेतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. या अनुषंगाने आरबीआयने लोकांना सतर्क राहून, दिशाभूल आणि फसवणूक करण्यासाठी डीपफेकसारख्या प्रगत तांत्रिक साधनांचा गैरवापर करणाऱ्या अशा योजनांना बळी न पडण्याचे आवाहन केले आहे. एकीकडे मशीन लर्निंग, रोबोटिक्स, थ्री डी प्रिंटिंग, नॅनो टेक्नॉलॉजी, चॅट-जीपीटी, कृत्रिम बुद्धिमत्ता इत्यादी आधुनिक तंत्रज्ञान अनेक प्रकारे आपले आपले दैनंदिन अधिक सोपे, सुसह्य आणि सुकर करत असताना आपल्यासाठी नवनवीन धोकादायक समस्या देखील निर्माण करत आहे त्याची हे आणखी एक उदाहरण म्हणावे लागेल.

**-प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२१ नोव्हेंबर**

**१८७४ :** - 'महाभारत, पुराणे यांचे भाषांतरकार अप्पाशास्त्री सदाशिव राशिवडेकर यांचा जन्म. 'संस्कृतचंद्रिका' या मासिकाचे संपादन असणाऱ्या अप्पाशास्त्रींनी 'श्री भविष्यमहापुराण' व 'श्री विष्णुपुराण' आदींची भाषांतरे केली. **१९१०: -** लेखक, नट, नाटककार, दिग्दर्शक, वक्ते शंकर वामन कुलकर्णी यांचा जन्म. **१९२९ : -** लेखक, बालसाहित्यिक प्रा. डॉ. महादेव विनायक गोखले यांचा जन्म. ह्यांनी 'ऐलमा पैलमा' ही स्त्री जीवना-वरील कादंबरी तसेच 'संत एकनाथ', 'संत ज्ञानेश्वर', 'भीष्म' यांच्या चित्रचरित्रासह 'श्री शिवछत्रपती', 'श्री अध्यात्म रामायण', 'आला संतांचा मेळा', 'छत्रपतींचे पंतप्रधान', 'नाट्यरुप शिवशाही', 'योगवसिष्ठ' मिळून दहाहून अधिक संपादित ग्रंथ. त्यांच्या बालसाहित्यात 'असे शूर असे सरदार', 'तसं व्हायचंच मला', 'वासुदेवाची आली स्वारी' हे कथासंग्रह, 'अपूर्व दान', 'इच्छामरण', 'व्हिक्टोरिया', 'मराठा तितुका मेळवावा' मिळून १५ नाटिका आणि त्यांच्या चरित्र ग्रंथात संत गोरोबा, चांगदेव, नामदेव, बाळाजी बाजीराव मिळून वीस एक चरित्र ग्रंथ. **१९२९ :-** खुसखुशीत, नर्मविनोदी शैलीचे लेखक शंकर नारायण नवरे यांचा जन्म. सहा कादंबऱ्या, पाच ललितलेख संग्रह, २७ कथासंग्रह आणि 'गुंतता हृदय हे', 'सूर राहू दे', 'वर्षाव', 'अँड रिडक्शन सेल' यांसह एकंदर १४ स्वतंत्र वा आधारीत नाटके लिहिली होती. २५ सप्टेंबर २०१३ रोजी त्यांचे निधन झाले. **१९३० : -** 'नागीण', 'नदीपार', 'मामाचा वाडा' या कथासंग्रहांचे लेखक 'चारुता सागर' म्हणजेच दिनकर दत्तात्रय भोसले यांचा जन्म. त्यांच्या कथेतून दलित व शोषित पिडीत माणसांचे भावविश्व रेखाटते. **१९३२ : -** शिक्षण क्षेत्रातील अनुभवांवर विविध शिक्षणक्षेत्रात विविध प्रयोग केलेले प्रयोगशिल लेखक प्राचार्य डॉ. मा. गो. माळी यांचा जन्म. त्यांच्या लेखनसंपत्तेत ४० हून अधिक पुस्तके प्रकाशित. त्यामध्ये 'एक शिक्षकी शाळा तंत्र आणि मंत्र', 'निर्वव एक शिक्षकी शाळा', 'साखर शाळा योजना', 'शिवरायांचे एक गुरु मोनी महाराज' तसेच फुले, आंबेडकर, शाहू यांच्यावरही त्यांनी पुस्तके लिहिलीत. **१९३५ :-** प्रसिध्द साहित्यिक दत्ता मारुलकर यांचा जन्म. त्यांच्या साहित्यात 'खेळ' हे कामगार जगतावर आधारलेल्या पुस्तकाशिवाय 'गानसरस्वती' हे किशोरी आमोणकर यांचे तर 'अंतर्यामी सूर गवसला' हे श्रीनिवास खळे यांचे चरित्र लिहिले तसेच 'स्वरहिंदोळे', 'गीतरामायण मागोवा शब्दस्वरांचा' ही पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९३५:-** कवी, कथाकथनकार प्रभाकर गणप-तराव तल्लारवार यांचा जन्म 'ज्ञानोदय बालमेवा', 'प्रभातरंग' हे काव्यसंग्रह प्रसिद्ध. **१९३८:-** लेखिका माला केकतपुरे यांचा जन्म. 'सांजवात', 'संचार' हे कथासंग्रह, 'गाभाऱ्यातील स्वप्न', 'मिटली स्वप्नकळी' ह्या एकांकिका, दोन नाटके आणि १५० हून अधिक नभोनाट्ये. कथाकवितांचे कार्यक्रम त्यांचे नागपूर आकाशवाणीवर प्रसारित झाले. **१९५० :-** वर्तमानपत्र आणि नियतकालिकांतून वनस्पतीविषयक लेखन करणाऱ्या लेखिका, वक्त्या प्रा. कांचनगंगा रविंद्र गंधे यांचा जन्म. यांनी महाराष्ट्र विज्ञान पत्रिकाचे संपादन केले असून 'गणेशपत्री' या पुस्तकातून त्यांनी गणेश पुजणाच्या वेळेस लागणाऱ्या स्पतींची शातीय माहिती दिली आहे तर 'वृक्षवल्ली आम्हा' या पुस्तकातून परिचित धार्मिक, औषधी, व्यावहारिक माहिती दिली आहे. शास्त्रीय, 'शोभा' **१९५२: -** ख्यातनाम नाटककार शफाअतखान यांचा जन्म. 'मुंबईचे कावळे' हे त्यांचे पहिलेच नाटक गाजले. त्यानंतर 'किस्से भाग १व २', 'भूमितीचा फार्स', 'राहिले दूर घर असे एकापेक्षा एक सरस नाटके त्यांनी मराठी रंगभूमीला दिली. **१९५९ : -** कादंबरीकार राजन गवस यांचा जन्म. त्यांच्या 'तणकट'ला साहित्य मिळाला, तर चौंडक, भंडारभोग, कळप' आदी त्यांच्या अन्य कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. याशिवाय 'तिरकसपणातील सरळता' हे कांदबयांचे विवेचन आणि 'मराठी आशययुक्त अध्यापन' ही त्यांची आण पुस्तके.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२१ नोव्हेंबर

१) श्री.प्रकाश सीताराम रानडे शिवलकर-नाका, अलिबाग, २१-११-१९४४
२) श्रीम.शामला शरद बोरवणकर विद्यानगर, अलिबाग, २१-११-१९४७
३)श्री.राजेंद्र भास्कर पवार रेवस-अलिबाग २१-११-१९५५
श्री.कमलाकर महादेव ठाकूर श्रीबाग-२, अलिबाग २१-११-१९४५

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# सुधागडमध्ये सुरळीत मतदान

**। पाली । वार्ताहर ।**

पालीसह सुधागड तालुक्यामध्ये विधानसभा निवडणूक मतदानाच्या वेळी बुधवारी (दि.२०) सकाळपासून मतदार केंद्रांवर मतदानासाठी तुरळक गर्दी होती. दुपारी एक वाजेपर्यंत मतदान ३० टक्क्यांपर्यंत पोहोचले होते. आदिवासी वाड्यापाड्यात व गाव खेड्यातील मतदारांनी शिस्तीचे पालन करुन मतदान सुरळीत पार पडले. पालीतील ग. बा. वडेर हायस्कूल व जिल्हा परिषद शाळा या मतदान केंद्रावर ज्येष्ठांनी मतदानाचा हक्क बजावला. काही ज्येष्ठ नागरिक हे चारचाकी वाहनांनी मतदान केंद्रावर पोहोचले व आपल्या मतदानाचा हक्क बजावला.



पालीतील ग.बा. वडेर हायस्कूल हे मतदान केंद्र गैरसोयीचे होत होते. कारण येथे पोहोचण्यासाठी मोठी चढण चढून जावे लागत होते. शिवाय मतदान केंद्राच्या बाहेर दगड व खाचखळगे आहेत. त्यामुळे वृद्ध महिलांची गैरसोय होत होती. यावेळी सुधागड तालुक्यातील बाहेरगावी असलेल्या बऱ्यापैकी मतदारांनी गावी येऊन मतदानाचा हक्क बजावला.

#### ग्रामस्थांचे शिस्तीत मतदान

आदिवासी वाड्यापाड्यात व गावांत ग्रामस्थांची शिस्त पाहायला मिळाली. छोट्या गावांमध्ये देखील मतदार अतिशय शिस्तीमध्ये येऊन रांगेत उभे राहून मतदान करून गेले. शिवाय मतदान करतेवेळी अतिशय शांतता देखील होती. तालुक्यातील भावशेत गावातील मतदान केंद्रावर गावासह आजूबाजूच्या ठाकुरवाडी व कातकरवाडी येथील मतदार सकाळी येऊन शिस्तीचे पालन करून मतदान करून गेले. अशीच परिस्थिती भेरव, वाघोशी व इतरही गाव खेड्यात व आदिवासी पाड्यांमध्ये पाहायला मिळाली.

#### सेल्फी पॉइंटवर गर्दी

पालीतील ग.बा. वडेर हायस्कूल मतदान केंद्राच्या खाली सेल्फी पॉईंट लावण्यात आला होता. या ठिकाणी अनेक मतदारांनी मतदान करून आल्यावर शाई लावलेले बोट दाखवत सेल्फी घेतला. अनेकांनी आपल्या कुटुंबासमवेत तसेच आपल्या जोडीदारासमवेत सेल्फी घेतला.

दरम्यान, तालुक्यात मतदानावेळी कुठेही अनुचित प्रकार पहायला मिळाला नाही. सर्वत्र शांतता व सुव्यवस्था होती.

## तळ्यात दुपारनंतर मतदारांमध्ये उत्साह



**। तळा । वार्ताहर ।**

श्रीवर्धन मतदार संघातील तळा तालुक्यातील तळा शहरात मराठी मुलांची शाळा, मुलींची शाळा गो.म. वेदक विद्यामंदिरासह अन्य केंद्रात मतदारांनी मतदान करण्यासाठी सकाळपासूनच रांगा लावल्या होत्या. यावेळी तालुक्यात ३७ हजार मतदार असून महीला १८ हजार ९६४ व पुरूष १८ हजार ६४१ आहेत. सकाळच्या सुमारास ३५% मतदान झाले होते. मात्र, दुपारनंतर मतदारांची गर्दी वाढली आणी सांयकाळी ६ वाजेपर्यंत ६०% मतदान झाले. यावेळी ग्रामीण भागातील टक्केवारी वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, संपूर्ण देशाचे लक्ष महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीकडे लागून राहिले आहे. राज्यात २८८ मतदारसंघासाठी एकाच टप्प्यात मतदान पार पडत आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी शरद पवार, राष्ट्रवादी अजित पवार, शिवसेना शिंदे गट, शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवारांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

# वारकरी निघाले आळंदीकडे

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

आळंदी येथे २६ नोव्हेंबर रोजी श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचा संजीवन समाधी सोहळा आहे. त्यासाठी वारकरी आळंदीकडे मार्गस्थ झाले आहेत. कर्जत तालुक्यातील एक दिंडी वगळता अन्य दिंड्या बुधवारी (दि.२०) सकाळी आळंदीसाठी मार्गस्थ झाल्या आहेत. दरम्यान, वारकऱ्यांनी मतदान करूनच आळंदीकडे मार्गस्थ झाले.

२६ नोव्हेंबर रोजी आळंदी येथे यात्रा आहे आणि त्यामुळे या यात्रेसाठी १८ नोव्हेंबरपासून पायी दिंड्या मार्गस्थ झाल्या आहेत. कर्जत तालुक्यातील पिंपळोली येथील दिंडी मतदानाच्या आदल्या दिवशी मार्गस्थ झाली. अन्य बहुसंख्य पायी दिंड्या या बुधवारी तर काही मंगळवारी आळंदीकडे मार्गस्थ होणार आहेत. नेरळ येथील वारकरी संप्रदाय तसेच संत ज्ञानोबा तुकोबा संस्थेची पायी दिंडी रावण झाला. मात्र, त्यांनी सकाळी मतदानाचा अधिकार बाजावून हे सर्व वारकरी तुळशी वृंदावन डोक्यावर घेऊन वारीत सहभागी झाले.



# कर्जत मतदारसंघात ७५ टक्के मतदान

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत विधानसभा मतदारसंघात बुधवार शांततेत मतदान पार पडले. कर्जत मतदारसंघातील ३६२ मतदान केंद्रावर सायंकाळी ६ वाजेपर्यंत ७५ टक्के मतदानाची नोंद झाली. दरम्यान, मतदारसंघात तणावपूर्ण शांततेत आणि किरकोळ वाद वगळता शांततेत मतदान पार पडले.

कर्जत मतदारसंघात ३ लाख १३ हजार मतदार असून या मतदारसंघातील ३६२ मतदान केंद्रावर शांततेत मतदान सुरु झाले. सकाळी मॉक पोल घेत असताना केंद्रावर शांततेत मतदान प्रक्रिया सुरु असताना नेरळ कळंब रस्त्यावरील बिरदोले येथील मतदान केंद्रावर दोन गटातील कार्यकर्ते एकमेकांना भिडले. त्या घटनेबाबत कोणतीही नोंद नेरळ पोलीस ठाणे येथे झाली नसल्याची माहिती पोलिसांनी दिली.





कर्जत तालुक्यातील बिरदोले येथील मतदान केंद्रावर त्या मशीन बाबत उमेदवारांचे स्थानिक मतदान प्रतिनिधी यांनी आक्षेप घेतला आणि त्यामुळे तेथे मतदान यंत्र बदलून घेतल्यानंतर मतदान सुरु झाले. तालुक्यात सर्व ३६२ मतदान

# मुरुडमधील ज्येष्ठ मतदारांमध्ये उत्साह

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक करिता अलिबाग-मुरुड-रोहा मतदारसंघामधील मुरुड तालुक्यात मतदानाला बुधवारी सकाळी ७ वाजल्यापासून अत्यंत उत्साहात सुरुवात झाली. यावेळी शहरांसह ग्रामीण भागातील मतदान केंद्रावर मतदारांच्या रांगा दिसुन आल्या. यावेळी प्रत्येक बुथवर पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मतदानाच्या या उत्साहात जेष्ठ नागरिक, महिला पुरुष, दिव्यांग, नवमतदार यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला होता. दरम्यान, सर्व मतदान केंद्रावर निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यात पिण्याचे पाणी, मंडप किंवा शेड मतदार सहाय्यक केंद्र, प्रथमोपचार पेट्या, व्हिलचेअर आदिंसह या सर्व प्रकारच्या पुरकसोयी सुविधा प्रशासनाकडून उपलब्ध करून दिल्यामुळे जेष्ठ नागरिक व दिव्यांगानी समाधान व्यक्त केले आहे. यावेळी मुरुड मजगांव येथील मतदान केंद्रावर सिता रामचंद्र गायकर (८०) या आजीने आपला मतदानाचा हक्क बजावला. तसेच, अपंग व वयोवृद्ध यांनी मतदान केंद्रावर व्हिलरचरवरुन मतदानाचा हक्क जावला.





## म्हसळ्यात ५५ टक्के मतदान

**म्हसळा :** श्रीवर्धन विधानसभा मतदार संघातील म्हसळा केंद्रात बुधवारी सकाळी ७ वाजता मतदानाला सुरळीत सुरुवात झाली. यावेळी तहसील विभागाकडून सर्वोतपरी मतदान प्रक्रिया व्यवस्था करण्यात आली होती. दरम्यान, सकाळी ७ ते १० पर्यंत मतदानाचा ओघ अत्यल्प होता. मात्र, सकाळी ११ नंतर मतदानाला उत्स्फुर्तपणे प्रतिसाद मिळत गेला. लोकांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर दिसत होता. मतदानासाठी ७५ वर्षावरील आणि दिव्यांग रथाच्या माध्यमातून दिव्यांग मतदारांनी देखील उत्स्फूर्त पणे मतदान केले. सायंकाळी ५ वाजेपर्यंत साधारण ५२ % मतदान झाले होते.

# माणगाव तालुक्यात मतदान उत्साहात

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन मतदार संघाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी माणगाव तालुक्यात सर्वत्र बुधवारी (दि.२०) उत्साहात व शांततेत मतदानाची प्रक्रिया पार पडली. यादरम्यान तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी व माणगाव पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

श्रीवर्धन विधानसभा मतदार संघातुन महायुतीच्या राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या उमेदवार अदिती तटकरे, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षातर्फे अनिल नवगणे, अपक्ष उमेदवार राजेंद्र ठाकूर, मनसेचे उमेदवार फैसल पोपेरे, बहुजन समाज पार्टीच्या उमेदवार अश्विनी साळवी, बळीराज सेनेचे उमेदवार कृष्ण कोबनाक, अपक्ष उमेदवार युवराज भुजबळ, अश्रफ पठाण, संतोष पवार, मोहम्मद काशीम बुरहाउद्दीन सोलकर, अंनत गीते या ११ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले आहे. आता शनिवार (दि.२३) श्रीवर्धन येथे मतमोजणी होणार असून त्यानंतर श्रीवर्धनचा आमदार कोण हे निश्चित होईल.




# शार्लोटमधील गळतीचे पाणी उचलण्यासाठी लाखोंचा खर्च

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा अनोखा प्रकार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी ब्रिटिशांनी शार्लोट लेक बांधला. या लेकमधील पाणी मुख्य भिंतीमधून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती अनेक वर्षे सुरु आहे. मात्र, धरणाच्या भिंतीमधून लिकेज होणारे पाणी नंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विद्युत पंपाच्या सहाय्याने पुन्हा उचलून घेत असते. धरणाच्या खाली गेलेले पाणी पुन्हा उचलण्यासाठी जीवन प्राधिकरण लाखो रुपये खर्च करीत असून, माथेरानमध्ये शार्लोट लेकमध्ये जगावेगळी तऱ्हा दिसून येत आहे. दरम्यान, शार्लोट लेकचे संवर्धनाचे काम गेली तीन वर्षे प्रस्तावित असून, ते सुरु करावे आणि धरणाच्या भिंतीमधील लिकेज दूर करावेत, अशी मागणी माथेरान निसर्ग पर्यटन संस्था करीत आहे.



माथेरानचा शोध ब्रिटिशांनी १८५० मध्ये लावला. त्यावेळी तेथील जनतेच्या पिण्याच्या पाण्यासाठी शार्लोट लेकची निर्मिती केली. मात्र, ब्रिटिश काळात बांधलेल्या त्या धरणातून पाण्याची गळती सुरु आहे. धरणाचे संवर्धन करण्याचे काम अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे.धरणातून पाण्याची गळती अनेक वर्षे सुरु असून, ती गळती रोखण्यासाठी शासन आणि स्थानिक नगरपरिषद कोणत्याही उपाययोजना करताना दिसत नाही. नेरळ येथून उल्हास नदीवरून येणारे पाणी वगळता अन्य कोणताही पर्याय माथेरान नागरपरिषदेकडे उपलब्ध नाही आणि त्यामुळे शार्लोट लेकमधील पाण्याची गळती रोखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. धरणाला लागलेली गळती रौद्ररूप धारण करण्याची भीतीदेखील आहे. त्याचवेळी धरणातील पाण्याची गळती किती मोठी आहे, हे धरणात पुन्हा गळती झालेले पाणी टाकले जात आहे, त्यावरून दिसून येते.

धरणातून गळती होणारे पाणी हे धरणाच्या खाली विहिरीमध्ये साठवले जाते. त्यानंतर ते साठवलेले पाणी पुन्हा पम्पिंग करून शार्लोट लेकमध्ये टाकण्यात येते. अशी तऱ्हा जगाच्या पाठीवर कुठे नसेल, मात्र धरणातून गळती झालेले पाणी वाया घालवले जात नसल्याचा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा दावा आहे. मात्र, धरणाची गळती दिवसेंदिवस वाढत आहे, त्यामुळे त्यावर उपाययोजना करण्याची गरज असताना प्राधिकरणाकडून कोणत्याही उपाययोजना होत नसल्याचे दिसून येत आहे, असा आरोप माथेरान निसर्ग पर्यटन संस्थेचे अध्यक्ष संतोष कदम यांनी केला आहे. गेली तीन वर्षे माथेरान पालिका शार्लोट लेकमधील गाळ काढण्याचे काम करणार आहे, असे जाहीर करीत आहे. पण, माथेरान पालिका कशासाठी थांबली आहे, असा प्रश्न स्थानिकांना पडला आहे.

## उरण मतदार संघात ६६ टक्के मतदान

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण विधानसभा मतदार संघात मतदान शांततेत पार पडले आहे. एकूण ३ लाख ४२ हजार १०१ मतदान संख्या असलेल्या उरण मतदार संघात सकाळी १:०० वाजेपर्यंतच्या फक्त ३७ टक्के मतदान झाले होते. मात्र, दुपार नंतर मतदारांची मतदान करण्यासाठीची गर्दी वाढू लागली आणि सायंकाळी ५:३० वाजता ६६ टक्के मतदान झाले असून मतदार संघातील एकूण मतदान २ लाख २५ पेक्षा जास्त झाल्याची माहिती उरणचे निवडणूक निर्णय अधिकारी जनार्दन कासार यांनी दिली.सुयोग्य व सामुपचाराच्या वातावरणात मतदान प्रक्रिया पार पाडण्यात आली असून, मतदारांनी मतदानासाठी गर्दी केली होती.

# मापगावात मतदारांचा संमिश्र प्रतिसाद



**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील मापगाव विभागातील मतदारांचा मापगाव, बहिरोळे, मुशेत, सोगाव, चोंढी, किहीम येथील मतदान केंद्रावर दिवसभर समिश्र प्रतिसाद पाहायला मिळाला. यावेळी, भातशेती तयार झाली असल्याने शेतीकामाला जाण्यापूर्वी काही प्रमाणात शेतकरी, नोकरदार वर्गाने सकाळीच आपले मतदानरुपी कर्तव्य पार पाडले. तर, काहींनी दुपारनंतर गर्दी केली होती.

सोगाव विभागात सकाळी जास्त तर दुपारी काही प्रमाणात गर्दी कमी झाली होती. तसेच, दुपारी तीन नंतर मतदारांनी मतदान केंद्रावर गर्दी केली होती. नवमतदार यांनी मोठ्या उत्साहात आपले पाहिले मतदान केले. यावेळी नवमतदारांसह स्त्री व पुरुष मतदारांनी मोठ्या प्रमाणात मतदान केंद्रावर मतदान केले. यावेळी दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, यांना रांगेत उभे न करता त्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येत होते. मतदान केंद्रावर निवडणूक अधिकारी यांनी सर्व मतदारांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, आशा सेविका, पोलीस विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी सहकार्य करत आपले कर्तव्य चोख पार पाडले.

# मुरुडमधील मतदानाचा टक्का वाढला



**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यात मतदानासाठी सकाळ पासूनच लांबच लांब रांगा पहायला मिळाला. तसेच, शहर व ग्रामीण भागात मोठा उत्साह पाहायला मिळाला. मुरूडमधील शाळा क्रमांक १ मध्ये नवापाडा कोळीवाडा, बाजारपेठ, तांबट आळी, किनारा हॉटेल परिसर, जुना पाडा कोळीवाडा, सर एस.ए. हायस्कूल परिसरातील शहरी नागरिकांचे १२७८ एवढे मतदान होते. या केंद्रावर सकाळ पासूनची गर्दी हटली नाही. मुरुड शहरातील सर्वच मतदान केंद्रावर मोठ्या प्रमाणात महिला मतदानासाठी आलेल्या होत्या. मुरुड शहर व ग्रामीण प्रत्येक मतदान केंद्रावर मोठ्या प्रमाणात महिलांनी मोठी गर्दी केली होती.

यंदाच्या या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी मतदान करण्यासाठी विक्रमी गर्दी केली होती. सायंकाळी ५ वाजता सुद्धा मतदान केंद्रावर विक्रमी गर्दी होती. त्यामुळे सायंकाळी ६ नंतर अखेरचे मतदान ८० टक्के वर गेले असल्याची माहिती मुरुड तहसील कार्यालयाकडून देण्यात आली. शासनाने मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी विशेष कार्यक्रमद्वारे जनजागृती केली होती. त्याप्रमाणे यंदाचा मतदानाची टक्केवारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

## पान १ वरून

### रायगडाने गाठली साठी

पनवेलमध्ये १६.८९ टक्के मतदान, पेणमध्ये १८.९ टक्के मतदान, कर्जतमध्ये २०.१ टक्के मतदान, श्रीवर्धनमध्ये १८.२२ टक्के मतदान, उरणमध्ये २९.२६ टक्के मतदान, महाडमध्ये २२.६७ टक्के मतदान झाले आहे. चार तासांच्या कालावधीत उरण, महाड, कर्जत, अलिबाग या मतदारसंघात सर्वात अधिक आणि पनवेल मतदारसंघात कमी मतदान झाल्याची माहिती आकडेवारीनुसार देण्यात आली.

रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघात दुपारी १ वाजेपर्यंत ३४.८४ टक्के मतदान झाले. अलिबाग विधानसभा मतदारसंघात ४०.८६ टक्के, पनवेलमध्ये टक्के ३०.५६ टक्के, पेणमध्ये ३२.०१ टक्के, कर्जतमध्ये ३६.६ टक्के, श्रीवर्धनमध्ये ३३.२६ टक्के, उरणमध्ये ३७.७९ टक्के, तर महाडमध्ये ३७.०४ टक्के मतदान झाले आहे. दुपारी तीन वाजेपर्यंत झालेल्या मतदानामध्ये अलिबाग, उरण, महाड मतदारसंघामध्ये सर्वात जास्त मतदान झाले.

दुपारी तीन वाजेपर्यंत ४८ टक्के मतदान झाले. अलिबागमध्ये ५३ टक्के, पनवेलमध्ये ४१ टक्के, उरणमध्ये ५१ टक्के, कर्जतमध्ये ५५ टक्के, श्रीवर्धनमध्ये ४५ टक्के, पेणमध्ये ४८ टक्के आणि महाडमध्ये ४७ टक्के मतदान झाले. त्यामध्ये कर्जत, अलिबाग, उरण या मतदारसंघांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झाले असून, पनवेल, पेण, श्रीवर्धन, महाड या मतदारसंघात ४१ टक्क्यांपासून ४८ टक्केपर्यंत मतदान झाल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. संध्याकाळी पाच वाजेपर्यंत जिल्ह्यात ६१.०१ टक्के मतदान झाले. अलिबागमध्ये ६७.६ टक्के, पनवेलमध्ये ५२.०९ टक्के, कर्जतमध्ये ६५.०८ टक्के, उरणमध्ये ६६.८४ टक्के, पेणमध्ये ६१.०८ टक्के, श्रीवर्धनमध्ये ५७.७२ टक्के आणि महाडमध्ये ६४.०४ टक्के मतदान झाले.

### राज्यात मविआचे सरकार येणार

१४ जागा, अशा एकूण ११८ जागा महायुतीला मिळताना दिसत आहेत. राज्यात सरकार स्थापन करण्यासाठी एकूण १४५ जागांची आवश्यकता आहे. अर्थात, या मॅजिक आकड्यापासून महायुती दूर राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

'इलेक्ट्रोल एज'च्या पोलनुसार, काँग्रेस ६० जागांसह राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा पक्ष तर महाविकास आघाडीतील सर्वात मोठा पक्ष ठरण्याचा अंदाज आहे. याशिवाय, महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाला ४६ जागा, तर शिवसेना ठाकरे गटाला ४४ जागा मिळताना दिसत आहेत. अशा प्रकारे महाविकास आघाडीला एकूण १५० जागा मिळण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. अर्थात, महाविकास आघाडी राज्यात सत्ता स्थापन करण्याचा अंदाज या एक्झिट पोलमधून वर्तवण्यात आला आहे. याशिवाय, इतरांना २० जागा मिळण्याचा अंदाज पोलमध्ये वर्तवण्यात आला आहे. महत्त्वाचे म्हणजे, हा केवळ एक्झिट पोलचा अंदाज आहे.

### सुप्रिया सुळेंची सायबर सेलमध्ये तक्रार

प्रकरणावर सुप्रिया सुळे म्हणाल्या, एका सशक्त लोकशाहीसाठी ही फार खेदजनक बाब आहे. विनोद तावडे हे महाराष्ट्राचे नाही तर देशातील मोठे नेते आहेत. जर पैसे वाटूनच मतं खरेदी करायची आहेत, मग लोकशाही कसली? असा सवाल करत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाला कालच्या या प्रकाराने धक्का पोहोचवला असल्याचा संताप सुप्रिया सुळे यांनी यावेळी व्यक्त केला.

# मतदानासाठी तरुणांनाही लाजवेल असा वृद्धांचा उत्साह



> आपले एक मत देशाचे भविष्य घडवू शकते. मताधिकार बजावल्यावरच आपण विकासाबाबत, आपल्या हक्क व अधिकाराबाबत खंबीरपणे बोलू शकतो. चांगले सरकार निवडून देण्यासाठी आपले एक मत खूप काही करू शकते म्हणून निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावतो. –तिजाबाई मुलचंद ओसवाल, वय ९६, ज्येष्ठ महिला,

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

विधानसभा निवडणुकीत मतदारांमध्ये तरुणांनाही लाजवेल असा उत्साह सुधागड तालुक्यात ज्येष्ठांमध्ये पाहायला मिळाला. अनेक ज्येष्ठांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. व लोकशाही सदृढ व समृद्ध करण्यासाठी आपले मोठे योगदान दिले.

शरीर साथ देत नसताना देखील अनेक वृद्धांनी मतदानासाठी मतदान केंद्र गाठले. आणि आपला मताधिकार बजावला. नवमतदार व तरुण यांनी देखील मतदानासाठी गर्दी केली होती.

मात्र ज्येष्ठांनी मतदानासाठी दाखवलेला हा पुढाकार आणि या परिस्थितीतदेखील ते मतदानासाठी बाहेर पडले होते ही बाब सगळ्यांसाठीच आदर्श अशी होती. काही ठिकाणी ज्येष्ठांनी आपल्या बोटाची शाई दाखवत फोटो देखील काढले. मतदान केंद्रावर वृद्धांसाठी वेगळी रांग होती आणि त्यांना मतदानासाठी पुढे घेतले जात होते. मतदान केंद्रामध्ये वृद्धांना बसण्यासाठी खुर्ची व बाकड्यांची व्यवस्थादेखील केली होती.

# कर्जतमधील मतदान केंद्रावर गोंधळ

## केंद्र अधिकारी मतदारांची दिशाभूल करत असल्याची तक्रार

**। कर्जत । वार्ताहर ।**

राज्यात लोकशाहीचा उत्सव सुरू असताना कर्जत विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रावर गोंधळ उडाला असल्याची घटना समोर आली आहे. कर्जत तालुक्यातील बीड गावातील मतदान केंद्रावर अधिकारी मतदारांची दिशाभूल करत असल्याची नागरिकांनी तक्रार केली. यावरून काही काळ अधिकारी व मतदार यांच्यात गोंधळ निर्माण झाला होता. दरम्यान याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांना समजताच त्यांनी तात्काळ त्या ठिकाणी नवीन अधिकारी नियुक्त केला असल्याचे सांगण्यात आले आहे.

विधानसभा निवडणूकीचे बिगुल वाजल्यापासून कर्जत विधानसभा मतदारसंघात मोठमोठी राजकीय स्थित्यंतरे घडत राहिली. कधी संबंध पक्षाचा राजीनामा, तर कधी पक्षांतर अशी राजकीय नाट्य घडत कर्जत मतदारसंघात हाय व्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला. अशात बुधवारी (दि.२०) नोव्हेंबर रोजी प्रत्यक्ष मतदानावेळी सर्वत्र मतदान सुरळीत सुरू असताना बीड मतदान केंद्रावर गोंधळ झाल्याची घटना घडली. कर्जत तालुक्यातील बीड बूथ क्रमांक २२९ मध्ये सकाळी मतदान सुरळीत सुरू होते. अशात तेथील मतदान अधिकारी यांनी काही ज्येष्ठ मतदारांना प्रथम क्रमांकाचे बटण दाबण्यास सांगत असल्याची तक्रार उपस्थित मतदारांनी केली. यावरून वाद होऊन काही काळ येथील वातावरण तापले होते. तर बातमी समजताच अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांचे वडील हे देखील बुथवर उपस्थित झाले. संबंधित प्रकार पाहून ते देखील आक्रमक झाले.

हे प्रकरण निवडणूक निर्णय अधिकारी यांना समजल्यावर त्यांनी क्षेत्रीय अधिकारी, पोलीस अधिकारी यांना बीड येथे बुथवर पाठवले. तर या प्रकरणाची गंभीर दखल घेत त्यांनी सबंधित अधिकाऱ्याची तात्काळ उचलबांगडी करत नवीन अधिकारी नियुक्त केल्याने हा वाद निवळला मात्र या मतदान केंद्रावर तणाव निर्माण झाला होता.

> संबंधित प्रकार बूथ क्रमांक २२९ येथे घडला होता. याबाबत मला माहिती मिळाल्यावर मी झोनल अधिकारी, पोलीस अधिकारी याना तात्काळ संबंधित बुथवर पाठवून परिस्थितीचा आढावा घेण्यास सांगितले. तसे तिथे मतदान केंद्र अधिकारी यांच्याबाबत मतदारांचा काहीतरी गैरसमज झाल्याचे आमच्या लक्षात आल्यावर आम्ही संबंधित मतदान केंद्र अधिकारी यांना तिथून हलवून नवीन अधिकारी नियुक्त केला. बाकी तिथे मतदान सुरळीत पार पडले.
> – प्रकाश संकपाळ, निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांत अधिकारी

> आज मी मतदानासाठी आजोबांसह गेलो होतो. आजोबा वयस्कर असल्याने बुथवरील मतदान अधिकारी यांनी आजोबांना मदत करताना त्यांना १ नंबरचे बटण दाबा असं सांगितल्याचं मी ऐकलं. तसेच याअगोदर देखील जे ज्येष्ठ नागरिक मतदानासाठी गेले होते त्यांना ते १ क्रमांकाचं बटन दाबण्यास सांगत होते. हा प्रकार लोकशाहीला डाग लावणारा असल्याने आम्ही तात्काळ याबाबत आवाज उठवून संबंधित अधिकाऱ्याची तक्रार केली. यावेळी उपस्थित पोलीस अधिकारी यांनी देखील आम्हास सहकार्य केले नसल्याची खंत आम्हाला आहे.
> – रोशन रुठे, प्रत्यक्षदर्शी

# हजारो पोलीस बांधव मतदानापासून वंचित

**पनवेल :** ज्यांच्या बळावर लोकशाहीचा उत्सव साजरा होत आहे, त्याच पोलीसांना मतदानाचा हक्क गमवावा लागल्याचे समोर आले आहे. राज्यभरासह नवी मुंबई पोलीसांकडून त्याबाबत खंत व्यक्त होत आहे. यावेळी पहिल्यांदाच ऑनलाइन झालेल्या प्रक्रियेतील त्रुटींचा फटका पोलिसांना बसला आहे. यावर कोणीही उघडपणे बोलायला तयार नाहीत. विधानसभा २०२४ निवडणुकीसाठी मतदान होत असताना, बहुतांश पोलीसांना मात्र मतदानाचा हक्क बजावता आला नाही. नवी मुंबई पोलीस दलातील सुमारे साडेचार हजार पोलीसांपैकी सुमारे दोन हजार पोलीसांवर ही नामुष्की आली आहे. दरवेळी पोलीसांचे पोस्टल मतदान घेतले जाते. मागील लोकसभा निवडणुकीपर्यंत ही प्रक्रिया पोस्टामार्फत राबवली जात होती. परंतु यंदा प्रथमच मतदानाची प्रक्रिया ऑनलाइन राबविण्यात आली. त्यासाठी पोर्टलवर पोलीसांची माहिती भरण्यात आली होती.



● उरण विधानसभेचे शेतकरी कामगार पक्षाचे अधिकृत उमेदवार प्रीतम म्हात्रे यांनी आपल्या मतदान केंद्रावर जाऊन, मतदानाचा हक्क बजावला. यावेळी त्यांच्यासोबत पत्नी ममता म्हात्रे तसेच अन्य सहकारी होते.

# मतदारांना एसटी नसल्याचा फटका

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

विधानसभा निवडणुकीचे साहित्य पोहचविण्यासाठी तसेच निवडणूक कर्मचारी यांची ने-आण करण्यासाठी राज्य परिवहन मंडळाच्या बसेस वापरण्यात आल्या आहेत. त्यामुळे निवडणुकीला मतदानासाठी जातांना व इतर प्रवाशांची मोठी गैरसोय झाली.

बस स्थानकात तसेच नाक्यावर प्रवासी व मतदार एसटी बसची वाट पाहत ताटकळत उभे होते. अनेकजण खाजगी वाहनांना हात करत होते. निवडणुकीच्या कामासाठी लागल्याने एसटी बसेस कमी असल्याचे काही प्रवाशांना माहित होते. त्यामुळे त्यांनी प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनाबाबत असंतोष व्यक्त केला. काही मतदान केंद्रावर मतदारांना आणण्यासाठी रिक्षा, मिनिडोअर व खाजगी वाहनांची सोय होती. मात्र दुसऱ्या गावाला मतदानासाठी जाणाऱ्या मतदारांना वाहनांची सोय किंवा एसटी बस नसल्याने त्यांची मोठी गैरसोय झाली.



● आक्षी येथील सरपंच रश्मी पाटील, सदस्य रश्मी वाळंज, निरजा नाईक आणि कार्यकर्त्यांनी मतदानाचा हक्क बजावला.



● माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक मतदानाचा हक्क बजावताना.



● शेकापचे अलिबाग तालुका चिटणीस यांनी मतदानाचा हक्क बजावला यावेळी अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



● नागाव ग्रामपंचायत माजी सरपंच नंदकुमार मयेकर, निखिल मयेकर व सरपंच हर्षदा मयेकर व अन्य पदाधिकाऱ्यांनी मतदानाचा हक्क बजावला. (छायाचित्र : समीर मालोदे)


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● **सन स्टोन रीयल इस्टेट,** साईना कॉम्प्लेक्स, चर्चच्यासमोर(ऑफीस, अलिबाग व आजुबाजुच्या गावामध्ये N.A.Plat बागायती प्लॉट भातशेती खरेदी व विक्री. संपर्क :८६६९००६९०२/९२७०८८८८०३

● **वर्कशॉममध्ये कामासाठी मुले** पाहिजेत शिक्षण ITI कोणत्याही ट्रेडचा पगार- १२००० /महिना ८ तास ड्युटी संपर्क -९०४९६५५५२३

● **गुरुकृपा क्लासेस इयत्ता प्रि-प्रायमरी** ते ८ वी मराठी/सेमी/इंग्रजी माध्यम सर्व विषय शिकवले जातील. तसेच पाळणाघराची सोय आहे. संपर्क- ७२१८१५५४४८/९८२३९२०४०३

● **पाहीजे- रिसोर्टवर स्वयंपाक करणे,** वाडीची साफ सफाई करणेसाठी पुरुष/स्त्री/ अनुभवी केअर टेकर पाहीजे. सर्पकः- ८३२९१७५७९१

● **वर्कशॉपमध्ये कामाला मुले** पाहिजेत १० वी १२ वी पास/नापास पगार-१२००० रूपये १२ तास ड्युटी ठिकाण-बामणसुरे, चोंढी. संपर्क - ९८२३५८५३२१

● **नागाव मधील हॉटेल मध्ये काम** करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. हाऊस कीपर, नाईट शिफ्ट हाऊस कीपर, वेटर ० ते २ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२

● **अलिबाग एस.टी.स्टॅन्डजवळ** दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




● (छायाचित्र- समीर मालोदे)

# पोलादपूर तालुक्यात मतदारांमध्ये उत्साह

## प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ; मतदारांना अधिक सुविधा

**। पोलादपूर । वार्ताहर ।**

**तालुक्यातील १२ झोन आणि ६७ मतदान केंद्रामध्ये बुधवारी सकाळपासून मतदारांच्या रांगा लागण्यास असंख्य वाहनांद्वारे मतदारांची उपस्थिती कारणीभूत ठरली. पोलीसांनी पोलीस निरिक्षक अनिल जाधव आणि प्रशासनाने तहसिलदार कपिल घोरपडे यांच्या नेतृत्वाखाली या मतदान प्रक्रियेसाठी चोख बंदोबस्त व मतदारांना अधिक सुविधा देण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले.**



पोलादपूर तालुक्यामध्ये ४३ हजार ६९३ मतदारसंख्या असून अधिकाधिक वेगाने मतदान करून मतदारांना पुन्हा त्यांच्या शहरात रवाना करण्यासाठी राजकीय पक्षांचे कार्यकर्ते सक्रिय दिसून येत होते. पोलादपूर-३ मतदान केंद्र रानबाजिरे प्राथमिक शाळेमध्ये ९१३ एकूण मतदार संख्येपैकी आदिवासी मतदारांची संख्या ५० व इतर मतदारांची संख्या ८६३ असल्याने याठिकाणी दुपारपर्यंत मतदान होऊन नंतर शांतता दिसून आली. कापडे बुद्रुक येथील प्राथमिक शाळेतील मतदान केंद्रांमध्ये मतदारांची तुडूंब गर्दी दिसून आली. याठिकाणी परगावी राहणाऱ्या मतदारांच्या वाहनांची दाटी महाबळेश्वर आणि रस्त्याच्या दुतर्फा दिसून आली.

पोलादपूर ३५१ मतदान केंद्राबाहेर वारली आणि गोंडी चित्रकला असलेल्या प्रवेशद्वारामुळे मतदारांचे स्वागत होत असल्याचा आभास निर्माण झाला. अपंग तसेच सक्षम नसलेले ४८३ मतदार पोलादपूर तालुक्यात असल्याने प्रत्येक मतदान केंद्रावर अशा मतदारांसाठी व्हीलचेअरची सुविधा उपलब्ध करण्यात आली. पोलादपूर शहर तसेच ग्रामीण भागातील मतदान केंद्रांमध्ये आरोग्यसेविका तसेच आशासेविकांचा तैनात करण्यात आल्याचे दिसून आले.

राजकीय पक्षांचे कार्यकर्ते मतदान प्रक्रियेमध्ये अधिकृत प्रतिनिधी म्हणून मतदान केंद्रावर दिसून येत असताना अनेक ठिकाणी बूथवरील कार्यकर्त्यांमध्ये एकोपा दिसून आला. पोलादपूर तालुक्यातील सवाद, तुर्भे बुद्रुक, पोलादपूर, लोहारे, मोरसडे, देवळे, उमरठ, वाकण, चांभारगणी बुद्रुक, देवपूर, पळचिल, पैठण या १२ झोनमधील ६७ मतदान केंद्रांमध्ये दुपारी मतदारांची गर्दी कमी झाली. पोलादपूर शहरामध्ये दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास नळाचे पाणी भरून झाल्यानंतर महिला मतदारांची गर्दी वाढली. यानंतर दुपारी दोन वाजल्यानंतर गर्दी ओसरून जेवणाच्या वेळेनंतर पुन्हा साडेतीन वाजल्यानंतर गर्दी वाढू लागली. मात्र, ग्रामीण भागातील परगावी राहणारे मतदार आणि स्थानिक मतदार यांचे मतदान झाल्यानंतर दुपारपासूनच मतदान केंद्रावर शुकशुकाट दिसू लागला. दुपारी ३ वाजेपर्यंत पोलादपूर तालुक्यात सरासरी ३८ टक्के मतदान झाल्याची माहिती प्राप्त झाली असताना मतदानाची मुदत संपेपर्यंत ५४ टक्के सरासरी मतदान झाल्याचा अंदाज निवडणुक विभागाकडून व्यक्त करण्यात आला.

# मतदारांचा मतदान अधिकाऱ्यावर आक्षेप

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



कर्जत तालुक्यातील बीड बुद्रुक या मतदान केंद्रावर तेथील मतदान अधिकारी यांच्याकडून मतदारांना मतपेटीवरील एक नंबरचे बटण दाबण्याचा सल्ला दिला जात होता. त्यामुळे तेथजील ग्रामस्थांनी त्या केंद्राचे निवडणूक अधिकारी यांच्या विरोधात कर्जत विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे तक्रार केली.

बीड बुद्रूक मतदान केंद्र २३० वर तेथील मतदान केंद्र अधिकारी यांच्याकडून मतदारांना एकी नंबरचे बटण दाबण्याचा सल्ला दिला अजात होता. केंद्र अधिकारी हे मतदारांना मतदारांना संभ्रमित करून क्रमांक १ नंबरचे बटन दाबायला सांगत असल्याचा दावा येथील स्थानिक मतदारांनी केला आहे. यानंतर अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांचे वडील परशुरामी घारे यांनी त्या ठिकाणी भेट देत अधिकाऱ्यांना त्याबाद्दकल जाब विचारला. त्याचवेळी अपक्ष उमेदवार यांच्या वतीने कर्जत विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी प्रकाश संकपाल यांनी तातडीने त्या ठिकाणी जात तेथे असलेलं मतदान केंद्र अधिकारी यांना अन्य ठिकाणी पाठवून दिले.

# कर्जत मतदारसंघातील मतदान केंद्र संथगतीने

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



कर्जत विधानसभा मतदारसंघात निवडणूक सुरु असताना प्रत्यक्ष मतदानाच्या काळात मतदान केंद्र क्रमांक २७ आणि ५७ या दोन ठिकाणी मतदान यंत्र धीम्या गतीने चालत होते. त्यामुले त्या मतदान केंद्रांवर मतदान करण्यासाठी आलेल्या मतदारांना किमान दीड तास ताटकळत उभे राहावे लागत होते. मतदान यंत्र धीम्यागतीने चालत असल्याने मतदारांनी नाराजी व्यक्त केली.

कर्जत विधानसभा मतदारसंघातील पोशीर येथील मतदान केंद्र क्रमांक २७ वरील मतदान यंत्र हे धिम्या गतीने काम करीत होते. त्यामुळे तेथे मतदानासाठी आलेल्या मतदारांना किमान डिड तास रांगेत उभे राहावे लागत होते. त्या मतदान केंद्रावर १२४९ एवढे मतदान होणार होते. मात्र नोंदवण्यात येणाऱ्या प्रत्येक मतदार यांना आपले मत नोंदवण्यासाठी किमान दीड ते दोन मिनिटे लागत होती. त्यामुळे रांगेत उभ्या असलेल्या मतदारांना ताटकळत उभे राहावे लागत होते. त्यात ठिकाणी असलेल्या अन्य मतदान केंद्रावर अगदी सुरळीतपणे मतदान सुरु होते. त्यामुळे असंख्य मतदारांनी आपली नाराजी व्यक्त केली. दीड तास थांबूनदेखील मतदान करता येईल कि नाही याची खात्री नसल्याने अनेक मतदार घरी परत जाण्याच्या तयारीत होते. त्यावर तेथील मतदान केंद्र अधिकारी यांनी मशीन हळू चालत असल्याने उशीर होत असल्याने सांगितले.

धामोते येथील मतदान केंद्र क्रमांक ५७ मध्ये देखील मतदान अगदी धीम्या गतीने काम करीत होते.तथ्ये १२२४ मतदार असून तेथे मतदानासाठी आलेल्या मतदारांना यांना मतदान यात्रा धीम्या गतीने काम करीत असल्याने किमान तासभर ताटकळत थाम्बुन राहावे लागत होते. मात्र दुपारी चार नांतर हे मशीन चांगल्या पद्धतीने काम करू लागल्याने मतदान व्यवस्थित पार पाडले.

# तळा तालुक्यात शांततेत पार पडले मतदान

**। तळा । वार्ताहर ।**

श्रीवर्धन विधानसभेसाठी तळा तालुक्यात शांततेत मतदान पार पडले.श्रीवर्धन विधानसभेसाठी जवळपास ११ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे ठाकले आहेत.ज्यामध्ये महायुतीच्या आदिती तटकरे व महाविकास आघाडीचे अनिल नवगणे यांच्यामध्ये मुख्य लढत होणार असल्याचे चित्र आहे.

तालुक्यात विधानसभेसाठी ३७,६१५ नागरिक मतदान करणार असून यामध्ये पुरुष मतदार १८६५१ तर स्त्री मतदार १८९६४ एवढ्या आहेत.बुधवारी सकाळपासून शांततेत मतदानाला सुरुवात झाली. नेहमी प्रमाणे असणारा मतदारांचा उत्साह या विधानसभा निवडणुकीत मतदान केंद्रावर दिसला नाही.अगदी दुपारी बारा वाजेपर्यंत बहुतांश केंद्रावर संथगतीने मतदान सुरू होते.सायंकाळी चार नंतर नागरिक मतदानासाठी बाहेर पडत असल्याचे पाहायला मिळाले.



मतदारांना कोणत्याही व्यत्ययाशिवाय मतदान करता यावे तसेच तालुक्यातील एकही नागरिक मतदानापासून वंचित राहू नये यासाठी प्रशासनातर्फे तालुक्यात ५५ ठिकाणी मतदान केंद्रे उभारण्यात आली होती.यांसह मतदान केंद्रावर व्हीलचेअरची व्यवस्था, रॅम रेलिंग जाण्या-येण्याची वाहन व्यवस्था, तसेच दिव्यांगांना स्वयंसेवक, मदतनीस इत्यादी सोय करण्यात आली होती. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सर्वच मतदानकेंद्रावर चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सायंकाळी सहा वाजेपर्यंत सर्वच मतदान केंद्रावर कोणताही अनुचित प्रकार न घडता अगदी शांततेत मतदान

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## गांजा बाळगणारा एकजण अटकेत

पनवेल : गांजा हा अंमली पदार्थ जवळ बाळगल्याप्रकरणी कळंबोली पोलिसांनी एका इसमास ताब्यात घेतले असून त्याच्याकडून जवळपास १२ हजार रुपये किंमतीचा गांजा हस्तगत केला आहे. कळंबोली सर्कल जवळील साईबाबा मंदिराजवळ एक इसम गांजा जवळ बाळगून असल्याची माहिती कळंबोली पोलिसांना मिळताच वपोनि उन्मेश थिटे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पो.नि.अजय चव्हाण, म.सा. पो.निरीक्षक तृप्ती शेळके, पो.उपनि.अमोल चौगुले व पोलिसांच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून आरोपी कमल लोथी या इसमास ताब्यात घेतले असून त्याच्याकडून १२ हजार रुपये किंमतीचा गांजा पकडून गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली.

# मोबाईल लॉकर सोयीमुळे मतदार राजांची झाली चांगलीच सोय

**। पनवेल । वार्ताहर ।**

मतदान केंद्रावर मोबाईल घेऊन जाण्यावरून दरवर्षी वादंग निर्माण होत असल्याचे चित्र पाहायला मिळत होते परंतु यावर्षी निवडणूक आयोगातर्फे मतदान कक्षाबाहेरच मतदारांना आपले मोबाईल ठेवण्यासाठी मोबाईल लॉकरची सुविधा करण्यात आली आहे. त्यामुळे या सुविधेबाबत मतदारांनी समाधान व्यक्त केले आहे.



नागरिकांच्या जीवनामध्ये मोबाईल ही आज प्रत्येकाची गरज बनली आहे .परंतु मतदान करण्यासाठी जाताना नेहमी पोलीस व मतदारांमध्ये तसेच मतदार कर्मचाऱ्यांमध्ये वादांगाचे प्रसंग होत असल्याचे पाहायला मिळत होते. परंतु यंदा निवडणूक आयोगामार्फतच प्रत्येक मतदान कक्षाबाहेर मतदान लॉकरची सुविधा केल्यामुळे मतदानासाठी जाणाऱ्या नागरिकांना आपला मोबाईल मोबाईल लॉकरमध्ये सुरक्षित ठेवता येत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. प्रत्येक मतदान केंद्राबाहेर मोबाईल लॉकरमध्ये जवळजवळ सहा मोबाईल ठेवण्याची सुविधा करण्यात आलेली आहे. आपला मोबाईल निवडणूक आयोगामार्फत निर्माण करण्यात आलेल्या मोबाईल लॉकरमध्ये ठेवल्यानंतर त्याला लॉक करून मतदारांना मतदान कक्षामध्ये जाता येत आहे. तसेच मतदान करून मतदान कक्षाबाहेर आल्यानंतर आपल्या लॉकर मधून मोबाईल घेऊन मतदान कक्षाबाहेर पडता येत आहे. यापूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये मतदान केंद्रापासून २०० मीटरच्या बाहेर मोबाईल ठेवावा लागत होता. त्यामुळे मतदारांमध्ये तसेच पोलीस व मतदान कर्मचाऱ्यांमध्ये वादंगाचे प्रसंग निर्माण होत होते. परंतु यावेळी निवडणूक आयोगामार्फतच मतदान कक्षाबाहेर मोबाईल लॉकरची सुविधा केल्यामुळे मतदारांनी समाधान व्यक्त केले आहे.

## सोन्याच्या चेनची चोरी

**पनवेल** : पनवेल एस.टी.आगारात बसमध्ये चढत असणाऱ्या ६४ वर्षीय इसमाच्या गळ्यातील दोन तोळे वजनाची सोन्याची चेन अज्ञात इसमाने चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. बाळाराम बैकर (६४ रा.अलिबाग) हे पनवेल एस.टी.स्टँण्ड येथे अलिबाग एस.टी.बसमध्ये चढत असताना अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील दोन तोळे वजनाची सोन्याची चेन ज्याची किंमत ८० हजार रुपये इतकी आहे. चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही खालील अनुसूचीमध्ये विवरणीत मालमत्तेसंदर्भात **इस्प्रवा वेस्टा प्रायव्हेट लिमिटेड** (नाव कन्फर्म करणे) (सीआयएन : U७४९००MH१९९२PTC०६५५३९), कंपन्या कायदा, १९५६ अंतर्गत संस्थापित एक कंपनी व त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता : पहिला मजला, इम्प्रेशन हाऊस, ४२ ए, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा (पश्चिम), मुंबई - ४०० ०३१ व **रिव्हेरा लक्झरी प्रोजेक्ट फोर एलएलपी** (एलएलपीआयएन : एआअन८२९७) मर्यादित दायित्व भागीदारी कायदा, २००८ अंतर्गत संस्थापित एक मर्यादित दाायित्व भागीदारी संस्था व त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता : पहिला मजला, इम्प्रेशन हाऊस, ४२ ए, जी.डी.आंबेकर मार्ग, वडाळा (पश्चिम), मुंबई - ४०० ०३१ , महाराष्ट्र यांच्या हक्कांची चौकशी करीत आहोत.

कोणीही व्यक्ती वा संस्था यांचा खालील निर्देशित मालमत्ता वा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात कोणताही प्रभार, भार, हक्क, हितसंबंध वा दायित्व असल्याचा दावा असल्यास त्यांनी त्यासंदर्भात पुराव्यासहित लिखित स्वरूपात सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १५ दिवसांच्या आत अधोहस्ताक्षरितांना सूचित करावे अन्यथा असे कोणतेही कथित दावे, हितसंबंध, भार वा मागण्या या सर्व हेतूने वा दृष्टीने अधित्यागित व/वा परित्यागित समजण्यात येतील.

**अनुसूची**

पुढील विवरणीत निवासी जागा/युनिट - वॅड्डो डी म्हणून ज्ञात, मोजमापित अंदाजे २११ चौ. मी. चटई क्षेत्रफळ, तळ अधिक एक मजल्याच्या संरचनेचा समावेश, ३ (तीन) बेडरूम व टेरेस समवेत मोजमापित साधारण १७ चौ. मी. तसेच व्हरांडा/बाल्कनी क्षेत्र मोजमापित साधारण २२ चौ. मी. तसेच १ (एक) पार्किंग जागेच्या वापराच्या सर्वंकष हक्कासमवेत, प्रोजेक्टचे नाव एडन वॅड्डो, मोजमापित अंदाजे ७२८० चौ. मी. (७/१२ उताऱ्यानुसार) क्षेत्रफळाच्या जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड व ६९०० चौ. मी. (प्रत्यक्ष ताब्यानुसार) गट क्र ५०/१ व ५०/२ धारक मोठ्या बिगर शेतजमिनीचा भाग बनत असलेला, गाव दत्तापाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथील व त्यांतील जमीन, सामायिक क्षेत्र व अनुषंगिक सर्व हक्कांच्या अविभाजित हक्कांसमवेत.

**अभिराज हरीश**
**डी.एम. हरीश ॲन्ड कं.**
**वकील**
३०५-३०९, नीलकंठ, ९८, मरीन ड्राइव्ह,
मुंबई - ४०० ००२.
ई-मेल : notice@dmharish.com
दिनांक : २१.११.२०२४


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


# अंमली पदार्थ विरोधी पथकाची तळोजामध्ये धडक कारवाई

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवी मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने तळोजा भागात कारवाई करुन अंमली पदार्थ बाळगणाऱ्या एका नायजेरियन नागरिकाला अटक केली आहे. पोलिसांनी या नायजेरियन नागरिकांकडून तब्बल ५ कोटी ६२ लाख रूपये किंमतीचे मेफेड्रॉन आणि कोकेन असे अंमली पदार्थ जप्त केले आहे. या कारवाई प्रमाणेच पासपोर्ट आणि व्हिसाची मुदत संपलेली असताना बेकायदेशीररित्या वास्तव्यास असलेल्या नायजेरियन नागरिकाला देखील अंमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली आहे. या दोन्ही नायजेरियन नागरिकांच्या पासपोर्ट आणि व्हिसाची मुदत संपलेली असताना त्यांना राहण्यासाठी घर देणाऱ्या दोन्ही घरमालकाला देखील या गुन्ह्यात सहआरोपी करण्यात आले आहे.

**प्रघर मालकाविरूद्ध कारवाई**

**या कारवाईत अटक करण्यात आलेल्या दोन्ही नायजेरियन नागरिकांच्या पासपोर्ट आणि व्हिसाची मुदत संपलेली असताना देखील त्याची माहिती पोलिसांना न देता, त्यांना राहण्यासाठी घर देणारे घर मालक रमेश पावशे आणि नामदेव ठाकूर यांना देखील या गुन्ह्यामध्ये सहआरोपी करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा पुढील अधिक तपास तळोजा पोलीस करीत आहे.**

तळोजा धरणा कॅम्प येथील शिर्के बिल्डिंगमध्ये राहणारा नायजेरियन नागरिक अंमली पदार्थांची विक्री करत असल्याची तसेच त्याच्या राहत्या घरामध्ये त्याने मेफेड्रॉन आणि कोकेनचा साठा करुन ठेवल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. सदर माहितीच्या आधारे आर्थिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदशनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत नायडू, निलेश धुमाळ आणि त्यांच्या पथकाने तळोजा धरणा कॅम्प येथील शिर्के बिल्डिंगमधील रुम नंबर १२१वर छापा टाकला. यावेळी पोलिसांनी सदर घरात राहण्यास असलेल्या ओनयेका हिलरी इलोडिन्सो या नायजेरियन नागरिकाची आणि त्याच्या घराची झडती घेतली असता त्याच्याजवळ तब्बल ५ कोटी ६२ लाख ७० हजार रुपये किंमतीचे २ किलो ४२ ग्रॅम वजनाचे मेफेड्रॉन आणि १७४ ग्रॅम वजनाचे कोकेन सापडले. त्यामुळे पोलिसांनी सदरचे अंमली पदार्थ जप्त करुन ओनयेका इलोडिन्सो याला एनडीपीएस ॲक्ट नुसार अटक केली. त्यानंतर अमली पदार्थ विरोधी पथकाने त्याच इमारतीतील रूम नंबर ३०१ मध्ये राहणाऱ्या चिडीबेरे ख्रिस्तोफर मुओघालु या नायजेरियन नागरिकाला ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली असता, त्याच्या पासपोर्ट व व्हिसाची मुदत संपलेली असताना देखील तो सदर घरामध्ये राहत असल्याचे आढळून आले. त्यामुळे अंमली पदार्थ विरोधी पथकाने त्याला देखील परदेशी नागरीक कायदा व रजिस्ट्रेशन ऑफ फॉरेनर्स ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करून त्याला देखील अटक केली आहे. न्यायालयाने या दोन्ही नायजेरियन नागरिकांची पोलीस कोठडीत रवानगी केली आहे.नागरिकांनी आपले घर भाड्याने देण्यापूर्वी भाडेकरुची पार्श्वभूमी तपासून खात्री करुनच त्यांना घर भाड्याने द्यावे. गैरकृत्याची माहिती स्वतः पोलिसांना द्यावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.



# ज्येष्ठ नागरिक, अपंगांनी सुद्धा बजाविला मतदानाचा हक्क

**पनवेल** : १८८ पनवेल विधानसभा मतदार संघामध्ये सर्वसामान्य नागरिकांसह ज्येष्ठ नागरिक व अपंगांनी सुद्धा उत्साहाने घराबाहेर पडत मतदानाचा हक्क बजाविला आहे.आज सकाळपासूनच सर्वच मतदान केंद्रामध्ये मतदान करण्यासाठी मतदार राजाची रांग लागली होती. यामध्ये सर्वसामान्य नागरिकांसह प्रथमच मतदान करणारे तरुण वर्ग तसेच ज्येष्ठ नागरिक, अपंग व्यक्ती सुद्धा उत्साहाने व हिरीहिरीने सहभागी झाले होते. अत्यंत शांततेत पार पडलेल्या या मतदानामध्ये विविध राजकीय पक्षाचे पुढारी, पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच सर्वसामान्य नागरिकांनी रांगेत उभे राहून आपल्या मतदानाचा हक्क बजाविताना दिसून येत होते. निवडणूक आयोगातर्फे प्रत्येक केंद्रावर स्वयंसेवक व मदतनीस, पोलीस कर्मचारी व अधिकारी ठेवण्यात आले होते.

### जाहिर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकतीचे मालक १) श्री. विलास बाळकृष्ण चंदने २) श्री. विवेक वसंत शहासने ३) श्री. किरण वसंत शहासने यांचेकडून सदर खालील प्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत विकत घेणेचे ठरविलेले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पा. |
|---|---|---|
| १० | ३ | ०.१५.९० |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरील प्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

दिनांक २१/११/२०२४

**ॲड. रूपेश एकनाथ पाटील**
बी. ए. एल. एल. बी
शिव ओम अपार्टमेन्ट, गाळा नं १०
कचेरी रोड, मुद्रे बु. कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९०९६०६०४०४

**ॲड. स्नेहेंद्र पवार**

### चौकशी जाहीर नोटीस

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये

बदल अर्ज क्र :- ६४७/२०२४
सार्वजनिक न्यासाचे नांव :- 'कै आबा साहेब उत्तमराव बेडसे सेवा भावी संस्था पनवेल' ता. पनवेल, जि. रायगड
न्यास नोंदणी क्रमांक :- एफ - ३५३३ (रायगड)
सौ. डॉ. जयश्री प्रकाश पाटील :- अर्जदार

सर्व सबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेल्या अर्ज यासबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

३. खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीचे आहे काय ?

इ) स्थावर मिळकत :- (वर्णन)

क्षेत्र १००२.८३ चौ. मी, प्लॉट नं. ०६, सेक्टर ७ ई, कळंबोली, नवी मुंबई, ता. पनवेल, जि. रायगड हे क्षेत्र या संस्थेने दुय्यम निबंधक वर्ग-२, करारनामा प्रमाणे सिडको लिमिटेड कडुन रू. १,५८,३२,६८०/- ने खरेदी केली.

**चतु:सीमा**
पूर्व :- L/Art/ Institutim
पश्चिम : Genral Hespital
दक्षिण : ११:०० मी रुंद रस्ता
उत्तरेस : खादी (Diversim Channeal)

सदरच्या चौकशी प्रकरणांमध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत वा कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनीशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड यांचे शिक्यानिशी आज दिनांक १९/११/२०२४ रोजी दिली.

**सही/-**
**प्रभारी अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**रायगड विभाग, रायगड**

# कसोटीपूर्वी दोन खेळाडूंची एन्ट्री

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेला २२ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. या मालिकेतील पहिला सामना पर्थमध्ये तर दुसरा सामना ॲडलेडमध्ये ६ डिसेंबरपासून खेळवला जाणार आहे. तसेच तिसरा सामना १४ डिसेंबरपासून ब्रिस्बेन येथे खेळवला जाणार आहे. बॉक्सिंग डे टेस्ट २६ डिसेंबरपासून मेलबर्नमध्ये होणार आहे आणि शेवटची टेस्ट सिडनीमध्ये ३ जानेवारीपासून सुरू होईल.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेला २२ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. या मालिकेतील पहिला सामना पर्थमध्ये तर दुसरा सामना ॲडलेडमध्ये ६ डिसेंबरपासून खेळवला जाणार आहे. तसेच तिसरा सामना १४ डिसेंबरपासून ब्रिस्बेन येथे खेळवला जाणार आहे. बॉक्सिंग डे टेस्ट २६ डिसेंबरपासून मेलबर्नमध्ये होणार आहे आणि शेवटची टेस्ट सिडनीमध्ये ३ जानेवारीपासून सुरू होईल.

भारत आणि ऑस्ट्रेलिया कसोटी मालिकेकडे क्रीडाविश्वाचं लक्ष लागून आहे. कारण या मालिकेवरच वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप अंतिम फेरीचं गणित सुटणार आहे. असं असताना पहिल्या कसोटी सामन्यात टीम इंडियाला दोन धक्के बसले आहेत. रोहित शर्मा वैयक्तिक, तर शुबमन गिल कोपराच्या दुखापतीमुळे पर्थ कसोटीत खेळणार नाही.

भारत आणि ऑस्ट्रेलिया कसोटी मालिकेकडे क्रीडाविश्वाचं लक्ष लागून आहे. कारण या मालिकेवरच वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप अंतिम फेरीचं गणित सुटणार आहे. असं असताना पहिल्या कसोटी सामन्यात टीम इंडियाला दोन धक्के बसले आहेत. रोहित शर्मा वैयक्तिक, तर शुबमन गिल कोपराच्या दुखापतीमुळे पर्थ कसोटीत खेळणार नाही.





सामन्यासाठी अवघ्या काही तासांचा अवधी शिल्लक असताना बीसीसीआय निवड समितीने या दोन जागा भरल्या आहेत. युवा फलंदाज देवदत्त पडिक्कल याचा भारतीय संघात प्रवेश झाला आहे. सामन्यासाठी अवघ्या काही तासांचा अवधी शिल्लक असताना बीसीसीआय निवड समितीने या दोन जागा भरल्या आहेत. युवा फलंदाज देवदत्त पडिक्कल याचा भारतीय संघात प्रवेश झाला आहे.

**भारतीय कसोटी संघ:** रोहित शर्मा (कर्णधार), जसप्रीत बुमराह (उपकर्णधार), यशवी जयस्वाल, अभिमन्यू ईश्वरन, शुबमन गिल, विराट कोहली, केएल राहुल, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), सरफराज खान, ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), रविचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजा, मोहम्मद सिराज , आकाश दीप, परदीश कृष्णा, हर्षित राणा, नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर, देवदत्त पडिक्कल.

देवदत्त पडिक्कल नुकताच भारत ए संघाकडून ऑस्ट्रेलियात खेळला आहे. त्यामुळे त्याची शुबमन गिलच्या जागी संघात निवड करण्यात आली आहे.

देवदत्त पडिक्कल नुकताच भारत ए संघाकडून ऑस्ट्रेलियात खेळला आहे. त्यामुळे त्याची शुबमन गिलच्या जागी संघात निवड करण्यात आली आहे. वेगवान गोलंदाज यश दयाल याचाही संघात समावेश करण्यात आला आहे. यश दयालला राखीव खेळाडूंच्या यादीत समाविष्ट केलं आहे. एखाद्या गोलंदाजाला दुखापत झाल्यास त्याला संघात संधी मिळण्याची शक्यता आहे.

वेगवान गोलंदाज यश दयाल याचाही संघात समावेश करण्यात आला आहे. यश दयालला राखीव खेळाडूंच्या यादीत समाविष्ट केलं आहे. एखाद्या गोलंदाजाला दुखापत झाल्यास त्याला संघात संधी मिळण्याची शक्यता आहे.

# इशांत शर्मा अचानक संघात दाखल

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

एकीकडे इंडिया ऑस्ट्रेलियात होणाऱ्या बॉर्डर-गावसकर ट्रॉफी २०२४-२५ साठी जोरदार तयारी करत आहे, तर दुसरीकडे बऱ्याच दिवसांपासून टीममधून बाहेर असलेल्या इशांत शर्मासाठी मोठी बातमी आली आहे. इशांत शर्माला संघात स्थान मिळाले आहे.

सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीसाठी निवडण्यात आलेल्या २४ सदस्यीय दिल्ली संघात इशांत शर्माचा सम ाविश करण्यात आला आहे.

दिल्ली संघाची कमान लखनऊ सुपर जायंट्स म्हणजेच स्टार फलंदाज आयुष बडोनीकडे सोपवण्यात आली आहे. यश धुल आणि अनुज रावत हे संघात आहेत.

याशिवाय दिल्ली प्रीमियर लीग म्हणजेच डीपीएलच्या पहिल्या सत्रात एका षटकात सहा षटकार माराणाऱ्या

## थेट प्लेइंग-११ मध्ये मिळणार जागा

प्रियांश आर्यलाही संघात स्थान देण्यात आले आहे.गोलंदाज हर्षित राणा सध्या बॉर्डर-गावसकर ट्रॉफी स्पर्धेसाठी ऑस्ट्रेलियात असल्याने त्याला संघात स्थान मिळालेले नाही.

पर्थ येथे २२ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या पहिल्या कसोटीसाठी राणा भारताच्या प्लेइंग-११ मधील तिसरा गोलंदाज होण्याच्या शर्यतीत आहे.



केवळ १० प्रथम श्रेणी सामने खेळलेला हर्षित १४० किमी प्रतितास पेक्षा जास्त वेग आणि चांगली उसळी घेण्याची क्षमता यासह सातत्याने च म क दा र कामगिरी करत असल्याचे म्हटले जाते.

# विराटच्या पोस्टने सोशल मीडियावर खळबळ



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पर्थ कसोटी सुरू होण्यासाठी फक्त दोन दिवस उरले आहेत. याआधी टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहलीने एक्सवर अशी एक पोस्ट शेअर केली, ज्यामुळे सोशल मीडियावर खळबळ उडाली.

पर्थ येथे होणाऱ्या बॉर्डर गावसकर ट्रॉफी मालिकेतील पहिल्या सामन्याच्या दोन दिवस आधी विराट कोहलीने सोशल मीडियावर एक लांबलचक पोस्ट लिहून चाहत्यांच्या हृदयाचे ठोके वाढवले. कोहलीने त्याच्या एक्स प्लॅटफॉर्मवर WROGAN या कपड्यांच्या ब्रँडसोबतचा प्रवास शेअर करताना एक नोट लिहिली, परंतु त्याच्या पहिल्या काही ओळींनी चाहत्यांना धक्का दिला. अनेक चाहत्यांनी कोहलीची ही नोट त्याच्या निवृत्ती, घटस्फोटशी संबंधित असल्याचे वाटले. जेव्हा त्यांनी संपूर्ण पोस्ट वाचली तेव्हा चाहत्यांना समजले की ती पोस्ट निवृत्ती किंवा घटस्फोटशी संबंधित नाही.

कोहलीने याआधी महत्त्वाच्या वैयक्तिक आणि करिअर अपडेट्सची घोषणा करताना सोशल मीडियावर अशाच प्रकारच्या पोस्ट टेम्प्लेटचा वापर केला आहे. २०२२ मध्ये कसोटी कर्णधारपदावरून पायउतार होण्याबाबतही त्याने अशीच घोषणा केली होती. विराट फॉर्ममध्ये झगडत असला तरी टीम इंडियाला विराट कोहलीकडून पाच सामन्यांच्या बॉर्डर गावसकर ट्रॉफीमध्ये उत्कृष्ट काम गिरीची अपेक्षा आहे, कारण या देशात त्याच्याकडे उत्कृष्ट आकडेवारी आहे. कोहलीने २०११ पासून ऑस्ट्रेलियात १३ कसोटी सामने खेळले आहेत आणि या कालावधीत त्याने सहा शतके आणि चार अर्धशतकांच्या मदतीने १३५२ धावा केल्या आहेत. यामध्ये १६९ धावा ही त्याची सर्वो त्तम कामगिरी आहे. कोहलीची येथे सर्वोत्तम कामगिरी २०१४-१५ मालिकेतील होती, ज्यामध्ये त्याने चार कसोटी सामन्यांमध्ये ८६.५० च्या सरासरीने चार शतके आणि एक अर्धशतकांसह ६९२ धावा केल्या.

# हार्दिक पांड्याच्या कारकिर्दीला कलाटणी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

हार्दिक पांड्या हा मर्यादीत षटकांच्या क्रिकेटमधील एक दिग्गज क्रिकेटपटू आहे. कोणत्याही क्षणी बॅट किंवा चेंडूने सामना फिरवण्याची ताकद आहे. त्यामुळेच टी क्रिकेट फॉर्मेटमध्ये त्याचा वरचष्मा पाहायला मिळाला आहे. असं असताना मागच्या काही दिवसात त्याचं टी क्रमवारीतील अव्वल स्थान डळमळीत झालं होतं. इंग्लंडच्या लियाम लिव्हिंगस्टोनने त्याला मागे टाकून हे स्थान काबीज केलं होतं. त्यामुळे आता या स्थानावर हार्दिक पांड्या काही लवकर पोहोचत नाही असंच वाटत होत. पण हार्दिक पांड्याने पुन्हा अव्वल स्थान पटकावून दाखवलं आहे. संपूर्ण वर्षभरात आणि खासकरून दक्षिण अफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत केलेल्या चमकदार कामगिरीमुळे हे शक्य झालं आहे. हार्दिक पांड्याला टी क्रमवारीत अव्वल

स्थान मिळाल्याने त्याला नक्कीच बळ मिळणार आहे. आयपीएल २०२५ स्पर्धेत त्याला रिटेन केल्याने मुंबई इंडियन्स फ्रेंचायझीलाही योग्य निर्णय घेतल्याचं वाटलं असेल.

हार्दिक पांड्याने २०२४ या वर्षात टी फॉर्मेटमध्ये ३५२ धावा केल्या आहेत. त्यासोबत १६ विकेटही घेतल्या आहेत. दक्षिण अफ्रिकेविरुद्धच्या मालिकेतील शेवटच्या सामन्यात जबरदस्त गोलंदाजी केली. त्याने तीन षटकात एक निर्धाव षटक टाकलं.तसेच फक्त ८ धाव देत एक गडीही बाद केला. २४४ रेटिंग प्वॉइंटसह हार्दिक



पांड्या टी२० क्रमवारीत पहिल्या स्थानावर आहे. यापूर्वी इंग्लंडचा लियाम लिव्हिंगस्टोन पहिल्या स्थानावर होता. मात्र आता त्याची तिसऱ्या स्थानावर घसरण झाली आहे. टी २० फॉर्मेटमध्ये अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत हार्दिक पांड्या पहिल्या, नेपाळचा दीपेंद्र सिंग ऐरी दुसऱ्या, इंग्लंडचा लियाम लिव्हिंगस्टोन तिसऱ्या, ऑस्ट्रेलियाचा मार्कस स्टॉयनिस चौथ्या, श्रीलंकेचा माजी कर्णधार वानिंदू हसरंगा पाचव्या, अफगाणिस्तानचा मोहम्मद नबी सहाव्या, झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझा सातव्या, वेस्ट इंडिजचा रोमॅरियो शेफर्ड आठव्या, दक्षिण अफ्रिकेचा एडन मार्करम नवव्या आणि दहाव्या क्रमांकावर गेरहार्ड इरास्मम आहे.

# भारताचा पाकिस्तानला मोठा धक्का

## चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी होणाऱ्या वर्ल्ड कपबाबत मोठा निर्णय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी आता पाकिस्तानला एक मोठा धक्का दिला आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी पाकिस्तानमध्ये टी २० वर्ल्ड कप होणार होता. या टी २० वर्ल्ड कपबाबत आता भारताने मोठा निर्णय घेत पाकिस्तानला जबरदस्त हादरा दिला आहे.



वर्ल्ड कप अंध टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी पाकिस्तानात जाण्यास भारतीय संघाला परवानगी नाकारली आहे. सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेतला असल्याचे केंद्र सरकारने भारतीय अंध क्रिकेट संघटनेस कळवले आहे. भारतीय संघ बुधवारी (दि.२०) वाघा बॉर्डरमार्गे पाकिस्तानला जाणार होता. क्रीडा मंत्रालयाने वर्ल्ड कप स्पर्धतील भारताच्या अंध संघाच्या सहभागास मंजूरी दिली होती. मात्र परराष्ट्र मंत्रालयाने यास नकार दिला आहे. आमचा संघ वाघामार्गे बुधवारी पाकिस्तानला रवाना होणार होता. मात्र अजूनपर्यंत परराष्ट्र मंत्रालयाने आमच्या दौऱ्याला परवानगी दिलेली नाही. आमच्या दौऱ्यास परवानगी मिळणार नही असे आम्हाला अनधिकृतपणे कळवण्यात आले आहे, असे भारतीय अंध क्रिकेट संघटनेचे सचिव शैलेंद्र यादव यांनी सांगितले. हा निर्णय आम्हाला यापूर्वीच कळवला असता तर संघनिवडीची प्रक्रियाही आम्ही पूर्ण केली नसती, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

भारताचा अंध क्रिकेट संघ सध्या नवी दिल्लीत आहे. तिथेच त्यांचे २५ दिवसांचे निवड चाचणी शिबिर झाले. स्पर्धा सहभागाची आशा अजूनही सोडलेली नाही. अजून अधिकृत निर्णय आम्हाला कळवण्यात आलेला नाही.

# तिलक वर्माची उल्लेखनीय कामगिरी

**। दुबई । वृत्तसंस्था ।**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद अर्थात आयसीसीने बुधवारी जाहीर आयसीसीच्या ताज्या टी-२० क्रमवारीत भारताचा स्टार ऑलराउंडर हार्दिक पांड्या अव्वल स्थानी पोहोचला आहे. तर युवा फलंदाज तिलक वर्माने फलंदाजांच्या क्रमवारीत ६९ स्थानांची मोठी झेप घेतली आहे. क्रमवारीत तो तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे.

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या टी-२० मालिकेत हार्दिक पंड्याने शानदार कामगिरी केली होती. या कामगिरीमुळे त्याने इंग्लंडच्या लियाम लिव्हिंगस्टोन आणि नेपाळच्या दीपेंद्र सिंह ऐरी यांना मागे टाकत टी-२० ऑलराउंडरमधील अव्वल स्थान मिळवले.

टी-२०च्या ऑलराउंडर क्रमवारीत अव्वल स्थान मिळवण्याची हार्दिकची ही दुसरी वेळ आहे. याआधी आयसीसी टी-२० वर्ल्डकपच्या अखेरच्या टप्प्यात तो अव्वल स्थानी पोहोचला होता. ३१ वर्षीय हार्दिकला आयपीएलच्या पुढील हंगामासाठी मुंबई इंडियन्स संघाने रिटेन केले आहे. आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत दुसऱ्या सामन्यात त्याने नाबाद ३९ धावा केल्या होत्या. चौथ्या निर्णायक लढतीत ३ षटकात ८ धावा देत १ विकेट घेतली होती.



यामुळे भारताला मालिकेत ३-१ असा विजय मिळवता आला. आफ्रिकेविरुद्ध मालिकावीर पुरस्कार मिळवणाऱ्या तिलक वर्माने दोन शतकांसह २८० धावा केल्या होत्या. यामुळे त्याने क्रमवारीत ६९ स्थानांची मोठी झेप घेतली आहे. यामुळे क्रमवारीत तो तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. अव्वल स्थानी ऑस्ट्रेलियाचा ट्रेव्हिस हेड आहे.तर चौथ्या स्थानावर सूर्यकुमार यादव आहे. टॉप टेनमध्ये भारताचा यशस्वी जयस्वाल आठव्या स्थानावर आहे.

टी-२०मध्ये गोलंदाजांच्या क्रमवारीत ऑस्ट्रेलियाचा एडम झम्पा आणि नाथन एलिस यांना मोठा फायदा झाल्याचे दिसते. भारताचा जलद गोलंदाज अर्शदीप सिंग टॉप १० मध्ये आला असून तो क्रमवारीत ९व्या स्थानावर आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत त्याने दमदार कामगिरी केली होती. अर्शदीपचे हे करिअरमधील सर्वोच्च रेटिंग आहे.

## २२ वेळा पटकावला ग्रँडस्लॅम

# राफेल नदालचा टेनिसला गुडबाय

**। स्पेन । वृत्तसंस्था ।**

**लाल मातीचा बादशहा राफ ेल नदालची ३८ वर्षीय टेनिस कारकीर्द संपुष्टात आली आहे. डेव्हिस कपच्या उपांत्यपूर्व फेरीत स्पेनचा नेदरलँड्सकडून पराभव झाला. २२ वेळचा ग्रँडस्लॅम चॅम्पियन राफेल नदालने आपल्या कारकिर्दीतील शेवटचा सामना खेळला, ज्यात त्याला पराभव पत्करावा लागला. यासह त्याची कारकीर्द संपली. नदालने हा सामना ६-४, ६-४ अशा सरळ सेटमध्ये गमावला.**

नदालने गेल्या महिन्यात ऑक्टोबरमध्ये निवृत्तीची घोषणा केली होती. डेव्हिस कपमधील हा शेवटचा सामना असेल असे त्याने सांगितले होते. मंगळवारी नदालचा सामना ८०व्या क्रमांकाच्या बोटिक व्हॅन डी झांडस्चल्पशी झाला. बोटिकने या सामन्यात सुरुवातीपासूनच नदालला कडवी टक्कर दिली. त्याने पहिल्या सेटमध्ये नदालचा ६-४ अशा फरकाने पराभव केला. दुसऱ्या सेटमध्येही बोटिकने ५-४ अशी आघाडी घेतली होती, पण नदालने पुनरागमन करत ४-३ अशी आघाडी घेतली. मात्र तिला हा सेटही जिंकता आला नाही. बोटिकने दुसरा सेटही ६-४ असा जिंकून सामना जिंकला.

डेव्हिस कपमधील शेवटचा सामना खेळण्यापूर्वी राष्ट्रगीत सुरू असताना नदाल भावूक दिसला. त्याच्या डोळ्यातून पाणी वाहत होते. त्याचा व्हिडिओही चांगलाच व्हायरल होत आहे. मात्र, शेवटचा सामना जिंकून नदाल चाहत्यांना आनंद देऊ शकला नाही. पराभवानंतर त्याच्या चाहत्यांची दुहेरी निराशा झाली.

नदालने सोशल मीडियाच्या म ाध्यमातून निवृत्तीची घोषणा केली होती. त्याने इन्स्टाग्रामवर एक पोस्टही शेअर केली आहे. याम ध्ये त्याने त्याच्या अलीकडच्या काळातील संघर्ष आणि खेळताना त्याच्या शरीरावर झालेला शारीरिक परिणाम याबद्दल सांगितले.

नदाल म्हणाला होता, माझी शेवटची स्पर्धा डेव्हिस कप फायनल असेल, ज्यामध्ये मी देशाचे प्रतिनिधित्व करणार आहे, यासाठी मी खूप उत्साहित आहे. म ाझा विश्वास आहे की व्यावसायिक टेनिसपटू म्हणून माझ्या पहिल्या विजयाच्या आनंदानंतर मी आता पूर्ण वर्तुळाच्या शेवटच्या टप्प्यावर आलो आहे. डेव्हिस कप फायनल २००४ मध्ये झाली. मी स्वतःला सुपर सुपर लकी समजतो की मी खूप काही अनुभवले आहे.

## सर्वाधिक एकेरी ग्रँड स्लॅम जिंकणारे खेळाडू

**नोव्हाक जोकोविच – २४ राफेल नदाल– २२**
**रॉजर फेडरर – २० पीट सॅम्प्रास– १४**
**रॉय इमर्सन – १२**



# दमदार खेळीचं संजू सॅमसनला शानदार गिफ्ट

**। द. आफ्रिका । वृत्तसंस्था ।**

भारतीय यष्टिरक्षक फलंदाज संजू सॅमसनने दक्षिण आफ्रिका दौरा चांगलाच गाजवला. या दौऱ्यावर त्याने ४ टी-२० सामन्यांमध्ये २ शानदार शतके झळकावली आणि टीम इंडियाला ३-१ ने मालिका जिंकण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. संजूने गेल्या ५ डावात ३ शतके झळकावली आहेत. या उत्कृष्ट फॉर्मचा फायदा घेण्यासाठी संजू सॅमसनची केरळच्या कर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये संजू केरळचे नेतृत्व करणार आहे.

सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धा २३ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर दरम्यान खेळवली जाणार आहे. तो नुकताच सचिन बेबीच्या नेतृत्वाखाली रणजी ट्रॉफी खेळला. भारतीय कसोटी संघ सध्या पाच सामन्यांच्या बॉर्डर-गावसकर मालिकेसाठी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. आणि जानेवारीपर्यंत कोणतेही मर्यादित षटकांचे सामने खेळायचे नाहीत. त्यामुळे सॅमसन सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी खेळणार आहे.

सॅमसनने अलीकडील पाच टी-२० सामन्यांमध्ये तीन शतके झळकावली आहेत. त्याने बांगलादेश आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सलग दोन शतके झळकावली आणि त्यानंतर शतकासह दक्षिण आफ्रिका दौरा संपवला. त्याने बांगलादेशविरुद्धच्या तिसऱ्या आणि शेवटच्या टी-२० सामन्यात शतक झळकावले आणि त्यानंतर दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर पहिल्या टी-२० सामन्यात शानदार शतक झळकावून नवीन इतिहास रचला. अशा प्रकारे तो सलग दोन टी-२० शतके झळकावणारा पहिला भारतीय ठरला. यानंतर तो सलग २ सामन्यात शून्यावर बाद झाला असला तरी शतकासह मालिका संपवण्यात तो यशस्वी ठरला.

केरळ आपल्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी मोहिमेची सुरुवात २३ नोव्हेंबर रोजी हैदराबादमध्ये सर्व्हिसेस विरुद्ध करेल. केरळला गोवा, मुंबई, महाराष्ट्र, सर्व्हिसेस, नागालँड आणि आंध्र प्रदेशसह गट ई मध्ये ठेवण्यात आले आहे. केरळ संघ आपले सर्व सामने जिमखाना मैदान आणि राजीव गांधी स्टेडियम वर खेळणार आहे.

सय्यद मुश्ताक अली स्पर्धेसाठी केरळ संघ : संजू सॅमसन (कर्णधार), सचिन बेबी, रोहन कुनुमल, जलज सक्सेना, विष्णू विनोद, मोहम्मद. अझरुद्दीन, बेसिल थंपी, एस निझार, अब्दुल बासिथ, ए स्करिया, अजनास ईएम, सिजोमन जोसेफ, मिधुन एस, वैशाख चंद्रन, विनोद कुमार सीव्ही, बेसिल एनपी, शराफुद्दीन एनएम, निधीश एमडी.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)